रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ७२
www.ramprahar.com

सोमवार, २९ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कोकण विभागातील जिल्ह्यांना अलर्ट राहण्याचे निर्देश/२

कर्जतमध्येही शास्ती माफी; अभय योजना जाहीर/५

मिथुन मनहास बनले बीसीसीआयचे नवे अध्यक्ष/८

## कोकणातील कातळशिल्प जतन, संवर्धनासाठी सामंजस्य करार



**मुंबई** : जागतिक पर्यटन दिनानिमित्त कोकणातील अश्मयुगीन कातळशिल्प जतन, संवर्धन तसेच प्रचार, प्रसार आणि प्रसिद्धीसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन आणि निसर्गयात्री संस्था, रत्नागिरी यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. संयुक्त राष्ट्र पर्यटन संस्थेंतर्गत त्यांनी दिलेले घोष वाक्य 'पर्यटन आणि शाश्वत विकास' यास अधीन राहून कार्यक्रम झाला. 'युनेस्को'च्या जागतिक वारसा स्थळ दर्जा मिळण्याच्या प्रक्रियेत समाविष्ट असलेली कोकणातील अश्मयुगीन कातळशिल्प भवितव्यात कोकण पर्यटन क्षेत्रात आणि त्या अनुषंगाने सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण भूमिका निभावणार आहेत. जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन एमटीडीसीचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल यांनी केले.

# राज्यात पावसाचा जोर कायम

### नदी-नाले तुडुंब, धरणातूनही पाण्याचा विसर्ग

**सोलापूर : प्रतिनिधी**

मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाने पुन्हा धुमाकूळ घातला आहे. नद्या-नाले तुडुंब भरून वाहत असून शेतशिवार आणि गावे जलमय झाली आहेत. अशातच काही धरणांतून पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनल्याचे चित्र आहे.



हिंगोली जिल्ह्यात मध्यरात्रीपासून ते पहाटेपर्यंत मुसळधार पाऊस झाला. वसमत, कळमनुरी आणि औंढा नागनाथ तालुक्याला पावसाने झोडपून काढले. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. बीड जिल्ह्यात सखल भागात पाणी शिरले.

सोलापूरच्या करमाळा भागात मुसळधार पाऊस पडला असून सीना नदीच्या पाणीपातळीत पुन्हा वाढ झाली. त्यामुळे २०हून अधिक रस्ते बंद करण्यात आले. अहिल्यानगरमधील शेवगाव तालुक्याचा संपर्क तुटला असून तेथे येणारे रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे.

यवतमाळच्या आर्णी शहराला अरुणावती नदीच्या पुराचा फटका बसला असून अनेक नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरले. बीड आणि हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. जळगाव जिल्ह्यात दमदार पावसामुळे चाळीसगाव तालुक्यातील मन्याड धरणाच्या माणिकपुंज प्रकल्पात पाण्याची मोठी वाढ झाली. त्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून आढावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी हे आठ जिल्हे तसेच सोलापूर येथील जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करून पावसाच्या, मदतकार्याच्या स्थितीचा आढावा घेतला. मदतकार्यात केल्या जात असलेल्या उपाययोजना जाणून घेत त्यांनी काही सूचनाही केल्या. पावसामुळे धरणांचे विसर्ग वाढविले जात असताना नागरिकांना आधीच सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास तसेच सर्व अधिकाऱ्यांनी फिल्डवर राहून काम करावे, असेही सूचित केले.

## झेप्टो कामगारांच्या न्यायासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा आंदोलनाचा इशारा

### रायडर कामगारांवरील अन्यायकारक वागणुकीविरोधात आक्रमक भूमिका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील झेप्टो कामगारांना पूर्ववत कामावर घेण्याबरोबरच त्यांना न्यायिक सुविधा देण्यात याव्यात; अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी झेप्टो व्यवस्थापनाला दिला आहे.



झेप्टो पनवेल न्यू स्टोअर येथील कामगारांना अचानक आयडी रद्द करणे, विमा व अपघात संरक्षेचा अभाव, अन्यायकारक दंड आकारणी तसेच कामाच्या पद्धतीत मनमानी बदल अशा समस्या भेडसावत आहेत. स्टोअरमधील या १५ कामगारांवर होत असलेल्या अन्यायकारक वागणुकीविरोधात आमदार प्रशांत ठाकूर यांनी कंपनी व्यवस्थापनाला पत्र देत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

क्विक-कॉमर्स क्षेत्राचा कणा हे रायडरच आहेत. मुंबईत याआधी स्विगी (२०२३ साली), ब्लिंकिट (२०२४ साली) व झोमॅटो (२०१९ साली) यांच्या रायडर्सनी आंदोलन केलेले आहे. आता पनवेलमध्येही अशीच परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून आवाज उठविण्यात आला असून झेप्टो व्यवस्थापनाने कामगारांसाठी सकारात्मक कार्यवाही न केल्यास रायडर व त्यांच्या कुटुंबांसह आंदोलन केले जाईल आणि स्टोअर बंद करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी झेप्टो व्यवस्थापनाला दिला आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पनवेल येथील सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि दै. लोकमतचे (पुणे) संपादक संजय आवटे यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.

गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त सन्मान कर्तृत्वाचा... सन्मान पनवेलकरांचा या शीर्षकांतर्गत पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळा शनिवारी (दि. २७) पनवेलच्या मार्केटयार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाला.

### मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यास सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, सुप्रसिद्ध अभिनेत्री ऋतुजा बागवे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, 'कोमसाप'चे रायगड जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ आदी उपस्थित होते.

या वेळी संजय आवटे यांनी, आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी आपल्या भरीव मदतीतून शिक्षणाला प्राधान्य देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत असल्याचे गौरवोद्‌गार काढले. ते पुढे म्हणाले, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे दातृत्व आहेच, शिवाय ते दातृत्व कुठल्या ठिकाणी करावे याचे भानही आहे. जर शाळा चांगल्या नसतील तर विद्यार्थ्यांचे भवितव्य घडणार नाही, परंतु रामशेठ ठाकूर यांच्यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत असून असा नेता आम्हाला हवा आहे. त्यांचा हा शैक्षणिक आदर्श इतरांनी घेतला तर महाराष्ट्रात शिक्षणाबाबत चिंता असणार नाही.

वृत्तपत्र चालवणे ही मोठी कठीण गोष्ट आहे. आज पत्रकारिता बदलत चालली असून मोबाईलने क्रांती केली आहे. त्यामुळे माध्यमे हातात आली असली तरी विचार करायला शिकवत नाही. सर्वसामान्य माणूस हा अत्यंत महत्त्वाचा आहे. हा देश सर्वसामान्यांचा, तुमचा आणि माझा आहे. त्यामुळे सर्वसामान्य केंद्रबिंदू असला पाहिजे. त्यातूनच विकास होईल, असेही ते म्हणाले. **(पान २ वर..)**

## पंढरपूर, शिर्डी संस्थानकडून पूरग्रस्तांना एक कोटींची मदत

**पंढरपूर, शिर्डी : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सर्वत्र सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आणि शिर्डीच्या साईबाबा संस्थानने सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे.

पावसाचा सर्वाधिक फटका मराठवाडा विभागाला बसला आहे, तर उत्तर महाराष्ट्रातदेखील मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले आहे. या संकटात बळीराजाच्या मदतीसाठी अनेक सामाजिक संस्था हात देत आहेत. आता पंढरपूरची श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आणि शिर्डीच्या साईबाबा संस्थानने आपल्या सामाजिक बांधिलकीचा परिचय देत एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## उरणमधील विविध पक्षांचे कार्यकर्ते भाजपत



**उरण : रामप्रहर वृत्त**


उरण विधानसभा मतदारसंघात भाजप दिवसेंदिवस मजबूत बनतोय. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उरण उपशहर प्रमुख गणेश पाटील, काँग्रेस पक्षातून मोठी जुईचे माणिक कोळी तसेच शिंदेसेनेचे महालण विभागीय अध्यक्ष गणेश घरत या तिघांनी आपल्या समर्थकांसह रविवारी (दि. २८) 'कमळ' हाती घेतले. उरण शहरातील राम मंदिर सभागृहात हा पक्षप्रवेश सोहळा व कार्यकर्ता मेळावा आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला भाजप राज्य परिषद सदस्य रवी भोईर, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांचे निधन

**लातूर : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जीवन आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडणारे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भास्कर तात्याबा चंदनशिव यांचे रविवारी (दि. २८) दुपारी निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. लातूर येथे खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.



प्रा. चंदनशिव यांनी कथासंग्रह, संपादन, समीक्षा प्रांतातील साहित्य लेखन केले आहे. त्यांची लाल चिखल ही कथा प्रचंड गाजली होती.

## पनवेलमध्ये वोकल फॉर लोकल खरेदी-विक्री प्रदर्शनाला प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत पनवेल येथे वोकल फॉर लोकल या संकल्पनेवर आधारित खरेदी-विक्री प्रदर्शनाचे भव्य आयोजन रविवारी (दि.२८) करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन वर्षा ठाकूर यांच्या हस्ते झाले.

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या वतीने पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाच्या उद्‌घाटन समारंभास आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, सुनील बहिरा, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, सुरेखा मोहोकर तसेच रूपेश नागवेकर, ममता म्हात्रे, स्वाती कोळी, मालवणकर, अश्विनी अत्रे, कल्पना पाटील, कोमल कोळी, ज्योती देशमाने आदी उपस्थित होते. या वेळी सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या कार्यक्रमाचेही थेट प्रक्षेपण सर्वांनी अनुभवले.

प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या पनवेल शहराध्यक्ष रूचिता लोंढे, कोमल कोळी यांच्यासह महिला पदाधिकाऱ्यांनी संयोजक म्हणून परिश्रम घेतले.

### स्थानिक उत्पादनांना मिळाले व्यासपीठ

या प्रदर्शनातून स्थानिक उत्पादने, हस्तकला आणि पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात आला. महिलांच्या स्वयंसहाय्य गटांनी, स्थानिक उद्योजकांनी व कारागिरांनी आपल्या उत्पादनांचे आकर्षक स्टॉल्स येथे लावले होते. या उपक्रमामुळे स्थानिक उत्पादने व उत्पादकांना व्यासपीठ मिळाले असून वोकल फॉर लोकल या संकल्पनेला प्रत्यक्षात मूर्त स्वरूप मिळाल्याचे दिसले.



# कोकण विभागातील जिल्ह्यांना अलर्ट राहण्याचे निर्देश

## मनुष्य व पशुहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे : रामप्रहर वृत्त**



कोकण किनारपट्टीवरील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांना पुढील २४ तासांसाठी रेड अलर्ट दिल्याने जिल्ह्यातील आपत्कालीन यंत्रणेला सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. कालपासून झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यासह कोकण विभागातील जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा आढावा घेतला. यावेळी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी त्यांनी जिल्हा प्रशासनाला सज्ज राहण्याचे तसेच मनुष्य व पशुहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्याने दक्ष राहण्याचे निर्देश दिले.

या वेळी कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पालघर जिल्हाधिकारी इंदू राणी जाखड, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, मीरा भाईंदर, वसई विरार, भिवंडी या महानगरपालिकांचे आयुक्त दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, पालघर, रायगड, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मीरा भाईंदर, वसई-विरार या महानगरपालिकांच्या क्षेत्रात गेल्या २४ तासात पडलेल्या पावसाची माहिती घेतली. यात सर्वच ठिकाणी मुसळधार पाऊस पडला असला तरी सरासरी ८० ते १०० मिमी पाऊस पडल्याने सर्वांनी सांगितले.

ठाणे, पालघर, रायगड येथील नद्यांची पातळी वाढली असली तरी धोकादायक पातळीपेक्षा खाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. बदलापूरमध्ये काल एक व्यक्ती वाहून गेल्याची घटना वगळता कुठेही जीवितहानी अथवा पशुधन हानी झाल्याची घटना घडली नसल्याचे सांगण्यात आले. पावसाचा जोर कमी जास्त होत असल्याने अद्याप परिस्थिती नियंत्रणात आहे. तरीही रात्रीपर्यंत रेड अलर्ट दिला असल्याने प्रत्येकाने विशेष काळजी घेण्याचे निर्देश शिंदे यांनी यावेळी दिले.

ते पुढे म्हणाले की, ज्या ठिकाणी पावसाचे पाणी घरात शिरून लोकांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे अशा जागा आधीच हेरून लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी सारी सज्जता करावी, त्यासाठी पालिकांच्या शाळेतील वर्ग तसेच जेवण आणि पाण्याची सोय करावी. सर्वच आपत्कालीन यंत्रणांनी अलर्ट राहून आपले फोन २४ * ७ चालू ठेवावेत, कोणाचेही फोन आल्यास त्यांना उत्तर द्यावे. वीज महामंडळाबाबत फोन न घेण्याच्या तक्रारी येत असल्याने त्यांनी या सूचनेचे पालन कटाक्षाने करावे, असे सांगितले. तसेच आपत्कालीन सेवांमध्ये काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी ऑन फील्ड सज्ज राहावे.

ठाणे, भिवंडी, उल्हासनगर मनपा हद्दीतील धोकादायक इमारतींकडे विशेष लक्ष द्यावे, एखादी इमारत खचल्याची घटना निदर्शनास आल्यास ती इमारत तात्काळ रिकामी करावी, असे निर्देश श्री. शिंदे यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच धरणांच्या पाणी पातळीकडे लक्ष ठेवण्यासाठी विशेष मनुष्यबळ तैनात करावे, असेही सांगितले. मुंबई, ठाणे, भिवंडी आणि महामार्गावर ट्रॅफिक जॅम होऊन लोकांना तासन् तास लागू नयेत, यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे असे सांगून ते पुढे म्हणाले की, रायगड भागातील पावसाचा अंदाज घेऊन कुठे दरड कोसळण्याची शक्यता वाटल्यास ते गाव तातडीने रिकामे करून लोकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करावे. मुंबई आणि कोकणातील चार जिल्ह्यांमध्ये सध्या परिस्थिती आटोक्यात असली, तरीही पावसाचा जोर वाढला, किंवा कमी वेळात जास्त पाऊस पडला तरी त्या त्या महानगरपालिकांच्या हद्दीतील परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वांनी सज्ज राहावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले.

## सौर उर्जेच्या पथदिव्यांनी वारद येथील रस्ते उजळले

**खोपोली, रसायनी : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दितील असलेला वारद हे गाव निसर्ग रम्य वातावरणात वसलेले असून गावामध्ये जाण्यांसाठी वाहतुकीची सेवा नसल्यामुळे दिड किलो मिटर अंतर पायी चालत जावे लागते.या ठिकाणी रात्रीच्या वेळी सर्पटणा-या प्राण्यांची भिती असल्यामुळे त्यातच रस्त्यावर अंधार ही नेहमीची समस्या मार्गी लावण्यांचे आश्वासन सरपंच दिपाली पाटील यांनी ग्रामस्थांना दिले होते यामुळे एका नामवंत कंपनीच्या सीएस आर फंडातून हे सौर उर्जेवर चालणारे पथ दिवे बसविण्यांत आल्यांने येथिल ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहे.

गेले अनेक वर्ष येथिल ग्रामस्थ आंधारातून आपला मार्ग क्रमित करीत होते.या ठिकाणी जाण्यांसाठी खाजगी वाहानांचा वापर जरी होत असला तरी सुद्धा काही ग्रामस्थ पायी चालण्यांत धन्यता मानत असे.मात्र येथिल रस्ते दिव्या प्रमाणे दैदिप्यमान व्हावे यांच विचारांतून सरपंच,उपसरपंच सह सदस्य ग्रामसेवक यांच्या पुढाकारांने हा रस्ता प्रकाश मान झाल्यांचे दिसत आहे. तसेच येथिल प्रवास सुखमय होत असल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहे.

## सात हजारहून अधिक नागरिकांकडून स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतर्फे स्वच्छता विषयक मोठा उपक्रम रविवारी सायन पनवेल महामार्ग आणि ठाणे बेलापूर मार्ग या शहरातील दोन महत्वाच्या मुख्य मार्गांवर सखोल महास्वच्छता मोहीमेच्या स्वरूपात राबविण्यात आला. मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस पडत असूनही सकाळी ७ वाजल्यापासून सुरू झालेल्या या महास्वच्छता मोहीमेत ७ हजाराहून अधिक स्वच्छताप्रेमी नागरिक, महापालिका अधिकारी, कर्मचारी, स्वच्छताकर्मी यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होत शहर स्वच्छतेविषयीची आपली बांधिलकी दाखवून दिली.

विशेष म्हणजे या सखोल महास्वच्छता मोहीमेत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, अलिबाग यांचे ५ हजारहून अधिक श्रीसदस्य हे पद्मश्री, महाराष्ट्रभूषण डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या महामार्ग सखोल स्वच्छता महामोहीमेत सक्रिय सहभागी झाले होते.

या सखोल स्वच्छता महामोहीमेत डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्रीसदस्य यांना महामार्गावरील क्षेत्र वाटप करून देण्यात आले होते. वाशी, तुर्भे व सानपाडा, जुईनगर, नेरूळ, बेलापूर या विभाग कार्यालयांच्या हद्दीत येणा-या सायन पनवेल महामार्गाच्या स्वच्छता मोहीमेत तसेच तुर्भे ते दिघा या ठाणे बेलापूर मार्गाच्या स्वच्छता मोहीमेत ठराविक अंतराचे क्षेत्र श्रीसदस्यांच्या गटांना स्वच्छतेसाठी वाटप करून देण्यात आले होते. त्यामुळे अत्यंत नियोजनबध्दरित्या शिस्तीत ही मोहीम राबविण्यात आली. श्रीसदस्यांसोबत त्या त्या विभागांच्या हद्दीतील नागरिक, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व सदस्य, एनएसएसचे विद्यार्थी हे महापालिका अधिकारी-कर्मचारी, स्वच्छतामित्र यांच्यासह उत्स्फुर्तपणे आपापल्या विभागात सहभागी झाले होते.

## पनवेलच्या पत्रकारांनी केंद्रीय नागरी हवाई उड्डाण राज्यमंत्र्यांची घेतली भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण समितीच्या शिष्टमंडळाने रविवारी पुणे येथे केंद्रीय नागरी हवाई उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी केली.

यावेळी ना. मोहोळ यांनी प्रकल्पग्रस्तांच्या भावनांचा आदर राखून आणि राज्य शासनाच्या प्रस्तावाचा आधार घेत, विमानतळाला स्व. दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाणार असल्याचे ठोस आश्वासन दिले. पत्रकारांशी संवाद साधताना ना. मोहोळ म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांचे योगदान मोठे असून त्यांच्या भावना आम्हाला मान्य आहेत. त्यामुळेच नवीमुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचेच नाव मिळेल.

या भेटीवेळी शिष्टमंडळात ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, सय्यद अकर, विवेक पाटील, निलेश सोनावणे, रत्नाकर पाटील, संजय कदम, केवल महाडिक, राज भंडारी, प्रकाश म्हात्रे, विशाल रावसाहे सावंत, अनिल कुरघोडे, रविंद्र गायकवाड, साबीर शेख, गौरव जहागीरदार, गणपत वारगडा, सनिप कलोते, क्षितिज कडू, शंकर वायदंडे, सुभाष वाघपंजे, राम बोरीले, सुनील वारगडा, आशिष साबळे तसेच महिला सदस्य रुपाली शिंदे, दिपाली पारसकर, सुमेधा लिम्हण आदी उपस्थित होते.




**धाटाव : सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान रोहा तालुका गरबा फॅन्सी ड्रेस स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचा मानकरी खरापट्टी गावचा सुमेश गजानन चोरगे ठरला. त्याला खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.**

## मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**



कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित मुरूड वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय बॅरिस्टर ए.आर.अंतुले संकुल मधील राष्ट्रीय सेवा योजना १० युनिटच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात शेकडो विद्यार्थीनींनी व मान्यवरांनी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी करुन आरोग्य शिबीराचा लाभ घेतला.

यावेळी प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे,एन.एस. एस.प्रमुख- डॉ.श्रीशैल बहिरगुडे, एन एस.एस.प्रमुख- डॉ.गजानन मुनेश्वर, प्राध्यापक -सिध्देश सतविडकर, आयसीटीसी लॅब टेक्निशियन -समीर धांडोरे, पूजा तोंडलेल , लॅब टेक्निशियन - वैशाली पाटील, प्रा.प्रवेश पाटील, प्रा.प्रणव बागवे, प्रा.चिंतन पोतदार, रुफी आसावरे, मुस्कान रजब,ग्रामीण रुगणालय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की विद्यार्थ्यांनी तीन महिन्यांनी तरी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी करुन घ्यावी.यामुळे अशक्तपणा आणि इतर संभाव्य आरोग्य समस्या लवकर ओळखता येतात.रक्तामधील हिमोग्लोबिन हा शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शरीरात हिमोग्लोबिन पातळी कमी झाली तर अशक्तपणा जाणवतंय पातळी समतोल राखण्यासाठी आपल्या जेवणात रोजच्या रोज पाल्या भाज्या असाव्यात जेणेकरुन शरीरातली हिमोग्लोबिन पातळी कमी होणार नाही.आज एन एस एस १० युनिट च्या मार्फत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे तरी सर्व विद्यार्थ्यांनी चाचणी करुन घ्यावी असे आवाहन प्राचार्य यांनी केले.

## अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पालिका सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या सूचनेनुसार ठाणे जिल्ह्यासह रेड अलर्ट जारी केलेल्या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून नवी मुंबई महानगरपालिका सतर्क असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी मुख्यालयासह सर्व विभागांमधील आपत्ती निवारण कक्ष यांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी बचाव व मदत कार्यासाठी सज्ज राहावे असेही निर्देश दिले आहेत. नवी मुंबईत दिवसभरात ७८ मी.मी. पाऊस पडला. सर्वाधिक पाऊस ऐरोली दिघा भगत कोसळला. मोरबे धरणात देखील मुसळधार पावसाची नोंद झाल्याचे पाहायला मिळाले.

अतिवृष्टीच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत घाबरून न जाता व अफवांवर विश्वास न ठेवता शासन व प्रशासनाकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने नागरिकांना करण्यात येत आहे.

नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहावे जुन्या किंवा धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी तसेच गरज असल्यासच घराबाहेर पडावे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी आपल्या नजिकच्या महापालिका विभाग कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षाशी अथवा मुख्यालयातील मध्यवर्ती आपत्कालीन नियंत्रण केंद्राशी संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात येत आहे.

## पनवेलमध्ये १४ ऑक्टोबर रोजी डाक अदालत

**रायगड :** दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी, सकाळी ११.०० वाजता पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, २ रा माळा, पनवेल मुख्य डाकघर यांच्या कार्यालयाद्वारे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.नवी मुंबई रिजन विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/ समस्या ज्याचे निवारण ६ आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील.

## माणगाव आश्रमशाळेत हुतात्मा नाग्या कातकरी यांचा ९५वा स्मृतिदिन

**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम जिल्हा रायगड यांच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य लढ्यात २५ सप्टेंबर १९३० च्या चिरनेर जंगल सत्याग्रहात प्राणाची आहुती दिलेले हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांना वनवासी कल्याण आश्रम शाळा माणगाव या ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

२५ सप्टेंबर रोजी रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाज बांधवांनी वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगांव येथे उपस्थित राहून अभिवादन केले. यावेळी वनवासी कल्याण आश्रमाचे जिल्हा अध्यक्ष यशवंत पवार यांच्या हस्ते हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

आश्रम शाळेचे मुख्याध्यापक अरुण पाटील होते त्यांनी हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या शौर्य त्याग, बलिदानाची माहिती सांगून प्रेरणा दिली.कार्यक्रमाला जिल्हा सचिव मनोज कामत, मुख्याध्यापक उत्तम पाटील, उमेश जाधव, संजय कोळी, चंद्रकांत पवार, हरिश्चंद्र मांडवकर, राम कोळी, तसेच म्हसळा, माणगांव, रोहा येथील आदिवासी समाज बांधव उपस्थित होते.



पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनीही लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा आढावा घेत कौतुक केले. पुढे बोलताना त्यांनी वाचणाऱ्यांची संस्कृती आज संपत चालली आहे, पण पत्रकार कधी स्वस्त बसत नाही. जे तुम्हाला लिहिता येते ते लिहीत रहा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

गौरवमूर्ती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात म्हटले की, समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्ती, संस्थांचा पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने सन्मान करण्यात आला ही कौतुकाची गोष्ट आहे. वृत्तपत्रे ही सर्वसामान्यांचा आवाज उठवणारी असावीत. आवश्यक तेथे आक्रमक बातम्या प्रसिद्ध करून सर्वसामान्यांना वृत्तपत्रांनी न्याय दिला पाहिजे. प्रशासनाचे लक्ष वेधले पाहिजे. पत्रकारितेबरोबरच सामाजिक उपक्रमही राबवावेत.

सुप्रसिद्ध अभिनेत्री ऋतुजा बागवे हिने मनोगत व्यक्त केले.

सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन गौरव पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पनवेल टाइमचे संपादक गणेश कोळी यांनी केले.

वर्धापन दिनानिमित्ताने विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर-पनवेल... या विषयावरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके देण्यात आली. त्याचप्रमाणे फॅशन शो संचालक देवदत्त घरत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल सौंदर्यवती (रन वे) स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धकांनी प्रतिसाद दिला. त्यांच्या कलेला मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले.

## उरणमधील विविध पक्षांचे कार्यकर्ते भाजपत

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी भाषणात सांगितले की, भाजप हा विकासाभिमुख पक्ष असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश प्रगतिपथावर आहे. उरण तालुक्यातील नागरिकांना हवी असलेली विकासकामे आम्ही पूर्ण करू. पुढे बोलताना त्यांनी नव्या सहकाऱ्यांच्या सहभागामुळे पक्ष आणखी बळकट होईल, असे नमूद केले.

# टॅक्सीचालकांना मिळाला हक्काचा नाका

## भाजपप्रणित कामगार संघटनेच्या प्रयत्नांना यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वंदे मातरम जनरल कामगार संघटनेच्या अंतर्गत कार्यरत असलेली स्थानिक प्रकल्पग्रस्त टॅक्सी संघटना पनवेलने स्थानिक प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मोठा यश मिळाले आहे. रविवारी (दि.२८) या संघटनेला पनवेल शहरातील लाईफ लाईन हॉस्पिटलजवळ हक्काचा नाका सुरू झाला आहे.

पनवेल बस डेपो जवळ आयोजित समारंभात या नाक्यांचे व संघटनेच्या नामफलकाचे उद्घाटन पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन सोहळ्यात स्थानिक प्रकल्पग्रस्त टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, वंदे मातरम कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, उपाध्यक्ष रवी नाईक, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजपचे शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, नवीन पनवेल



शहराचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक सुनील बहिरा, एकनाथ देशेकर, अजय कांडपिळे आजी-माजी सरपंच तसेच रिक्षा व टॅक्सी चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्यात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत बदलतोय. या बदलत्या भारतात शहरात येणाऱ्या नागरिकांना सुविधा देणेच नाही तर परदेशाहून येणाऱ्या नागरिकांनाही सुविधा उपलब्ध करणे अत्यंत गरजेचे आहे. आणि येणाऱ्या काळात तुम्हाला ते काम करायच आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्त टॅक्सी संघटना पनवेलची स्थापना स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या हितासाठी करण्यात आली असून, या संघटनेने सतत या वर्गाला रोजगार आणि सुरक्षित नोकरीची हमी दिली आहे.

हक्काचा नाका मिळाल्यामुळे संघटनेला त्यांच्या टॅक्सी चालकांना अधिक संधी मिळतील आणि स्थानिक नागरिकांना सुव्यवस्थित वाहतूक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

# सीकेटी कॉलेजमध्ये आज जिल्हास्तरीय 'विकसित भारत युवा कनेक्ट'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि भारत सरकाच्या युवक कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत युवा कनेक्ट कार्यक्रमाचे सोमवारी (दि.२९) महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात आयोजन करण्यात येत आहे.

युवकांचे राष्ट्र म्हणून भारत देशाची ओळख असून राष्ट्र उभारणीमधील त्यांची अनन्यसाधारण भूमिका लक्षात घेवून विकसित भारत २०४७चे ध्येय लक्षात घेवून युवा शक्तीला मार्गदर्शन करण्यासाठी भारत सरकाच्या युवक कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयामार्फत गुरदीत सिंग वोहरा आणि आशुतोष सिंग उपस्थिती असणार आहे.

मुख्य अतिथी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर युवक वर्गाशी संवाद साधणार आहेत. आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय संचालक अजय शिंदे, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक सुशील शिंदे, कार्यक्रम अधिकारी रमेश देवकर, रायगड जिल्हा समन्वयक प्रा. टी. पी. मोकल, क्षेत्र समन्वयक डॉ. दत्ता हिंगमिरे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. रायगड जिल्हातील सर्व महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक उपस्थित राहणार आहेत.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभगाचे अध्यक्ष डॉ. राजेश येवले, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. आलोक भानुशाली, प्रा. सुशील घाडगे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. भाग्यश्री भोईर, एन.एस.एस. विषय शिक्षक प्रा. रूपेश माने आणि स्वयंसेवक-स्वयंसेविका आदी अथक परिश्रम घेत आहे.

# करंजाडे भाजपतर्फे नवरात्रोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्था करंजाडे, भारतीय जनता पक्ष करंजाडे यांच्यावतीने सार्वजनिक नवरात्र उत्सवाचे आयोजन करंजाडे येथे करण्यात आले आहे. यंदाचे हे आठवे वर्ष असून या ठिकाणी महिला भगिनी, पुरुष, तरुण वर्गाची मोठ्या प्रमाणात गर्दी पहावयास मिळत आहे.

नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दांडिया रास, पारितोषिक वितरण, विद्यार्थी गुणगौरव सोहळा, चित्रकला स्पर्धा, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, वैद्यकीय तपासणी, खेळ पैठणीचा, महिला उद्योजकांचा सन्मान, महिला



सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान, करंजाडे परिसरातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा गौरव, महिला शिक्षकांचा गौरव, शाळा सन्मान सोहळा यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन या ठिकाणी दररोज करण्यात येत आहेत. दांडिया खेळण्यासाठी मोठ्या संख्येने महिला सहभागी होत आहेत.

उत्कृष्ट परफॉर्मन्स करणाऱ्यांना बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येते. या नवरात्र उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार यांनी केले आहे.

# आशा स्वयंसेविका आणि स्वच्छता कामगारांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा कार्यक्रम राबवला जात आहे. या निमित्ताने भारतीय जनता पक्ष करंजाडे यांच्यामार्फत आशा स्वयंसेविका आणि स्वच्छता कामगार यांचा सन्मान सन्मान सोहळा २८ सप्टेंबर रोजी माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या पुढाकाराने करंजाडे येथे आयोजित करण्यात आला होता.

या वेळी मन की बात कार्यक्रमाचे आयोजन श्री



मंगल कार्यालय करंजाडे येथे करण्यात आले. पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते आशा स्वयंसेविका आणि स्वच्छता कामगारांचा सत्कार करण्यात आला. या वेळी आशा स्वयंसेविका आणि स्वच्छता कामगारांनी माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचे आभार मानले.

माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी आशा स्वयंसेविका आणि स्वच्छता कामगार हे करत असलेल्या कामाबद्दल त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला नितेश सोलंकी जिल्हा संयोजक आयटी सेल, बळीराम म्हात्रे माजी सरपंच, योगेंद्र कैकाडी माजी उपसरपंच, अतिश साबळे सदस्य, मंगेश बोरकर सदस्य, धोंडू भोईर ज्येष्ठ नागरिक, अशोक विखारे अध्यक्ष रिक्षा संघटना, वैशाली जगदाळे, पुनाराम चौधरी, चंद्रकांत आंग्रे, उमेश भोईर, केतन आंग्रे, ओमकार चौधरी, हरेश आंग्रे, अजय आंग्रे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.







**पनवेल :** नवरात्रोत्सवानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे शहरातील विविध सार्वजनिक मंडळांना भेट देत आई जगदंबेचे दर्शन घेतले. कामोठे शहर सार्वजनिक नवरात्र मंडळ सेक्टर, श्री कच्छ कडवा पाटीदार युवक मंडळ, अलंकापुरी नवरात्री उत्सव मंडळ तसेच युवा मित्र मंडळ येथे त्यांनी उपस्थित राहून देवीची आराधना केली. या वेळी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत करून नवरात्र उत्सवाची माहिती दिली. दरम्यान, पेण तालुक्यातील वाशी येथील श्री जगदंबा मंदिरालाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी मंदिर परिसरात भाविकांशी संवाद साधून त्यांनी देवीकडे जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. या वेळी भाजपचे दक्षिण रायगड उपाध्यक्ष मिलिंद पाटील, कामोठे शहरध्यक्ष विकास घरत, ज्येष्ठ नेते रवींद्र जोशी, हॅप्पी सिंग, माजी सरपंच गोरख पाटील, हर्षवर्धन पाटील, रवी गोवारी, विद्या तामखडे, हर्जिंदर कौर यांच्यासह इतर उपस्थित होते.

# रोहिदासवाडा येथे 'मन की बात'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रोहिदासवाडा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नागरिकांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत मिळाली.

कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, उपाध्यक्ष केदार भगत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, तसेच सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, पवन सोनी, विनायक मुंबईकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमात पंतप्रधानांच्या मन की बात या संदेशावर चर्चा झाली आणि त्यांच्या विचारांनी उपस्थितांचे मन प्रेरित केले.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी सहभागी सदस्यांचे कौतुक केले. तसेच उपस्थितांनी मन की बात कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळालेल्या संदेशाचे महत्व याबाबत आपले विचार मांडले.



# कोयनावेळे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त कोयनावेळे गावचे माजी सरपंच आणि भाजप पनवेल उत्तर मंडळाचे कोषाध्यक्ष विनेश विश्रामराव कदम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप आणि आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कोयनावेळे येथे झालेल्या शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि या उपक्रमाचा लाभ घेतला. शिबिरात नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करून आवश्यकतेनुसार मोफत चष्मे वाटप करण्यात आले तसेच विविध आरोग्य तपासण्यादेखील करण्यात आल्या. या शिबिरासाठी प्राचीन हेल्थ केअर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल तसेच नायर





सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, संचलित नवदृष्टी सेवा संस्था यांचे योगदान लाभले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या तसेच मार्गदर्शन केले. शिबिरास भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, युवा नेते विनोद पाटील, तळोजे मजकूर ग्रा.पं.चे माजी सरपंच संतोष पाटील, दीपक पाटील प्रभाग १चे अध्यक्ष नितेश पाटील, हरिदास पाटील, ज्येष्ठ भाजप कार्यकर्ते जयराम कदम, प्रकाश कदम, विजय कदम तसेच पनवेल तालुका माजी सैनिक सेलचे अध्यक्ष रमेश कदम आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेच्या कळंबोली प्रभाग समितीतर्फे आरोग्य तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता ही सेवा २०२५' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या कळंबोली प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक ७,८, ९, १०, १५ आणि १६ या ठिकाणी स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सुरक्षेचा लाभ मिळावा. या उद्देशाने प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या आरोग्य तपासणी शिबिरात स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबियांची नियमित आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक त्या वैद्यकीय सल्ल्याची व औषधोपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात



आली. स्वच्छतेसाठी दररोज मेहनत घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार घेण्यात आलेल्या या शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणीसोबतच रक्तदाब, मधुमेह, रक्तातील साखरेची तपासणी, लसीकरण व आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. तज्ञ डॉक्टरांकडून व्यक्तिगत सल्ला व आवश्यक असल्यास पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन देखील देण्यात आले. स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबीयांनी या आरोग्य तपासणी शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. आरोग्याच्या दृष्टीने अशा शिबिरांचे नियमित आयोजन होणे आवश्यक असल्याचे मत कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणारा हा उपक्रम स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

या शिबिरामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढली असून समाजातील एक महत्वाचा घटक असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना थेट लाभ मिळाला असल्याचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी सांगितले.




## संपादकीय

# वरुणराजाचा कहर

महाराष्ट्र सध्या पुन्हा एकदा निसर्गाच्या रौद्ररूपाला सामोरे जात आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत पूरस्थिती गंभीर झाली आहे. नदीकाठची गावे पाण्याखाली गेली, शेकडो हेक्टर शेती उद्ध्वस्त झाली, गुरेढोरे वाहून गेली आणि काही ठिकाणी मानवी जीवितहानीदेखील झाली आहे. प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत असले तरी परिस्थिती सततच्या पावसामुळे व्यवस्थापनही कोलमडत आहे.

**महाराष्ट्र राज्य नैसर्गिक वैविध्याने समृद्ध आहे. सह्याद्री पर्वतरांगांपासून विदर्भ-मराठवाड्याच्या पठारांपर्यंत निसर्गाचे अनोखे स्वरूप येथे पहायला मिळते, पण मागील काही वर्षांपासून बदलत्या हवामानामुळे या निसर्गसंपन्न राज्याला अनेकदा पावसाच्या तडाख्याला सामोरे जावे लागत आहे. या वर्षीही परिस्थिती वेगळी नाही. सततचा मुसळधार पाऊस, अतिवृष्टी आणि नद्यांमध्ये आलेला पूर यामुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्हे धोक्यात आले आहेत. विशेषतः मराठवाड्यात पावसाने थैमान घातले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मराठवाडा हा नेहमीच दुष्काळग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जातो. तेथे पावसाचे प्रमाण कमी असते, मात्र यंदा पावसाने आपले उग्र रूप दाखवले. सपाटीवर असलेल्या या भागात एकाच वेळी आलेल्या प्रचंड पावसाने शेतकऱ्यांचे हाताशी आलेले पीक पाण्याखाली गेले. कपाशी, सोयाबीन, तूर, मका यांसारखी खरीप पिके पूर्णतः उद्ध्वस्त झाली. काही ठिकाणी लोक वाहून गेले. रस्ते, पूल पाण्याखाली गेले. हजारो हेक्टर शेती जलमय झाली. अनेक शेतकरी कुटुंबे बेघर झाली. पुराच्या तडाख्यात शेतमाल तर वाहून गेला, पण दुर्दैवाने जनावरांचीदेखील मोठ्या प्रमाणावर हानी झाली. गुरेढोरे, मेंढ्या, शेळ्या वाहून गेल्या. शेतकऱ्यांसाठी ही सर्वात मोठी शोकांतिका ठरली, कारण शेतीसोबतच जनावरांवरच त्यांचा जगण्याचा आधार असतो. अनेक गावांत घरे पाण्यात गेली, वस्त्या जलयम झाल्या. काही ठिकाणी तर गावकऱ्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची वेळ आली. अशा संकटसमयी राज्य सरकार पुढे सरसावले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी घोषणा केली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच इतर मंत्र्यांनी पूरग्रस्त भागांचा दौरा करून लोकांना धीर दिला. प्रशासन यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असून बचाव व मदतकार्य सुरू आहे. पूरग्रस्तांसाठी तात्पुरती निवारा केंद्र उभारली गेली आहेत. नागरिकांना अन्नधान्य, पिण्याचे पाणी, औषधे आणि इतर आवश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या जात आहेत. जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस, एनडीआरएफ पथके सर्वजण एकत्र येऊन मदतकार्य करत आहेत. या गंभीर परिस्थितीचा आढावा घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी दिल्ली गाठत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील पूरस्थितीबाबत माहिती दिली. शेतकऱ्यांना आणि नागरिकांना मदतीसाठी केंद्र सरकारकडून तातडीची आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती त्यांनी केली. दोघांनीही महाराष्ट्राच्या संकटाबाबत संवेदनशीलता दाखवत केंद्र सरकार पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असे आश्वासन देत भरीव मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. अशा संकटसमयी शासन-प्रशासनाबरोबरच स्वयंसेवी संस्था, मंडळे, देवस्थाने, कलाकार, खेळाडू यांनीही मदतीसाठी पुढे आले पाहिजे. सर्वांच्या सहकार्यातून पूरग्रस्तांचे संसार पुन्हा उभे राहण्यास निश्चितपणे हातभार लागणार आहे.**

# वेणगाव येथील जागृत महालक्ष्मी देवी

कर्जत रेल्वे स्थानकापासुन पुर्वेकडे चार किलोमीटर अंतरावर कर्जत -जांभिवली रस्त्यावर वेणगाव येथे श्री महालक्ष्मी स्वयंभू देवस्थान आहे, हे महालक्ष्मी देवस्थान अति प्राचीन असुन पंचक्रोशीत तसेच मुंबई - पुण्याहून असंख्य भाविक नवरात्रोत्सवात आवर्जून दर्शनासाठी येतात. हे जागृत देवस्थान आहे.



१८५७ च्या आंदोलनातील पुढारी नानासाहेब पेशव्यांचा जन्म या वेणगाव गावी झाला, नवरात्रीला श्री महालक्ष्मी मंदीरात उत्सव व यात्रा भरत असल्याचा उल्लेख महाराष्ट्र राज्य गॅझेटियर रायगड जिल्ह्यांतील प्रेक्षणीय स्थळ पान. नं. ८६४ मध्ये आहे, या देवास्थानची आख्यायिका अशी सांगितली जाते की, कोल्हपुरची श्री महालक्ष्मी आपल्या बहिणीस भेटावयास जाताना तिच्या रथाचे चाक घसरले व थोड्याच अंतरावर रथाच्या एका घोड्याचा पाय घसरला, श्री महालक्ष्मी तेथेच वास करुन राहिली, ते ठिकाण म्हणजेच सद्यस्थितीतील असलेले श्री महालक्ष्मी मंदीर होय. देवीच्या रथाचे चाक व घोड्याचा पाय जेथे घसरला ती ठिक़ाणे मंदीर परिसरात आजही पहावयास मिळतात.

सुमारे दोनशे वर्षापुर्वी वेणगाव येथील एक गावकऱ्यांच्या स्वप्नात देवीने येऊन येथे वास करित असल्याचा दृष्टांत दिला व गावक-यांनी तिथे निवारा बांधला व श्री देवीचे दैनंदिन पुजा-अर्चा सांजवात सुरु केली व ती आजतागायत अव्याहतपणे सुरु आहे, काळाच्या ओघात मंदीर जिर्ण झाले होते तसेच भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी या श्रध्दास्थानाचा जीर्णोध्दार १९९७ साली विश्वस्त समितीने केला, देवीचे सथान स्वयंभू असुन तिच्या नवसाची प्रचिती अनेक भक्तांना आलेली आहे, यामुळे कर्जत पंचक्रोशी तसेच लांब लांबुन भक्तगण श्री महालक्ष्मीच्या दर्शनास अखंड येत असतात, हे मंदीर अतिशय रम्य अशा ठिक़ाणी आहे. आजुबाजुला डोंगर, शेती, वनश्री असल्याने या परिसरात आल्यावर खुपच प्रसन्न वाटते.

ट्रस्टतर्फे त्रिपुरा पोर्णिमा, हनुमान जयंती, होळी पोर्णिमा, सीमोल्लंघन व माघी गणेशोत्सव आदी कार्यक्रम केले जातात, नवरात्रीत नऊ दिवस दर्शनासाठी गर्दी होते, नऊ दिवस येथे पुजा सप्तशक्ती पाठ, पठण, अभिषेक, भजन-किर्तन असे कार्यक्रम आयोजित केले जातात, घट उत्थापनाचे दिवशी नवचंडी चा होम केला जातो.

श्री महालक्ष्मी दवी नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिध्द आहे. नवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे. अगदी दररोज चार-पाच किलोमीटर अनवाणी पायांनी येणारांची संख्यासुध्दा मोठी आहे.

# म्हसळ्याचे धावीर महाराज



म्हसळ्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज असून त्यांच्यासमवेत आवळनाथ, रवळनाथ, बापूजी, काळेश्वरी, जोगेश्वरी, भैरी, पद्मावती अशा देव-देवतांची स्थापना झाली. या कार्यक्रमाला श्री धावीर महाराज देवघटी बसले असे संबोधिले जाते.

यावेळी उपस्थित समस्त म्हसळाकर हात जोडून हे धाविर महाराजा आम्ही पारंपारीक सालकरी आणि समाजाचे मंडळीनी ज्ञात पध्दतीने तुझा नवरात्रोत्सव मांडला आहे, उत्सवामध्ये आमच्या हातुन चांगली सेवा होईल. ज्ञात अज्ञातपणे काही चुका सुध्दा होऊ शकतील, पण महाराजा हा उत्सव गोड मानून घे चुका झाल्यास माफ कर तुझ्या म्हसळागावाला संकटापासून दूर ठेव असे देवस्थानचे पुजारी सालकरी गणेश म्हशीलकर, शोभा (आजी) सुभाष म्हशीलकर, आणि समस्त समाज मंडळी ग्रामदेवतेसमोर नतमस्तक होऊन यावेळी जात, पात, धर्म, आसा वेगळा विचार न करता ईश्वराचरणी सांगतात आणि नवरात्र उत्सवास भाविकतेने सुखात होते. शहरांतील कुंभार, सोनार, तांबट ब्राह्मण, साळी, नाभिक, परीट, शिंपी, वाणी, मराठा, रोहीदास अथवा चर्मकार, सीकेपी, गवळी, बेलदार या मंडळींचे हे प्रमुख आराध्य दैवत आहे.. म्हसळ्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज देवस्थानचे यात्रोत्सवात मागिल दोन वर्षापासून खासदार सुनिल तटकरे यानी शासकीय मानवंदना देण्याची प्रथा सुरु केली.

**-संजय खांबेटे, म्हसळा**

# भिसेगावची अंबे भवानी माता

कर्जत रेल्वेस्थानकापासून अगदी दोन-तीन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या भिसेगावमध्ये श्री अंबे भवानी मातेचे मंदिर आहे. नवसाला पावणारी जागृत देवस्थान अशी या स्थळाची प्रचीती आहे.

या देवीबद्दल उपलब्ध असलेली माहिती अशी की, कर्जत नगरपरिषद हद्दीत असलेले भिसेगाव हे गाव भिसे खिंडीच्या पायथ्याशी आहे. पूर्वी या ठिकाणी खूप जंगल होते. व्यापारी वर्ग व्यापारासाठी मुंबई - पुण्याकडे जातांना याच खिंडीच्या मार्गाने जात. हे व्यापारी खिंडी जवळ असणाऱ्या विहिरीजवळ रात्री मुक्काम करून सकाळी पुढील प्रवासाला निघत. डोंगर माथ्यावर आदिवासी लोकांची वस्ती होती.

एके दिवशी एका गुजराथी व्यापाऱ्याला मुक्कामाला असतांना स्वप्न पडले. स्वप्नात देवीने दर्शन दिले. 'मी या विहिरीजवळ असलेल्या वारुळात आहे. मला त्यातून बाहेर काढ. माझ्या सोबतीला एक काळा नाग आहे. तो तुम्हाला काही करणार नाही. या स्वप्नाकडे लक्ष न देता



तो व्यापारी तेथून पुढे निघून गेला. काही दिवसांनी पुन्हा या ठिकाणी तो व्यापारी मुक्कामास आला असता त्याला तसाच दृष्टांत झाला. हा सर्व वृत्तांत त्याने आपल्या व्यापारी मित्रांना सांगितला.

या सर्व व्यापारी वर्गाने मिळून स्वप्न शोधण्याचे ठरविले. त्यांनी डोंगर माथ्यावर राहणार्या आदिवासींना मदतीला बोलून घेतले. सार्वजण वारूळ फोडण्यासाठी जमले असता त्या वारुळातून काळा नाग बाहेर आला व कुणालाही काहीही न करता बाहेर निघून गेला. त्यानंतर आदिवासी लोकांनी वारूळ फोडले. तो काय आश्चर्य खरोखर देवीची सुंदर रेखीव मूर्ती त्यातून बाहेर पडली.

ती मूर्ती पाहून सर्वांना आनंद झाला. आदिवासी व व्यापारी यांनी सावली म्हणून देवीच्या डोक्यावर छप्पर तयार केले. तेंव्हा पासून व्यापारी येता जाताना देवीची पूजा करून दर्शन घेऊन आपापल्या कामाला जात असत.

ही देवी कोणती ? असा प्रश्न कुतुहलापोटी लोकांमध्ये निर्माण होऊ लागला. तेंव्हा ज्या आदिवासी माणसाने वारुळास प्रथम हात लावला त्याच्या स्वप्नात जाऊन देवीने सांगितले की, मी गुजराथ येथील अबुच्या पहाडावरील श्री अंबे भवानी आहे.

तेव्हापासून या देवीला श्री अंबे भवानी माता असे लोक म्हणू लागले आणि भक्ती भावाने तिच्या भजनी पूजनी लागले. ग्रामस्थांनी एकत्र येऊन मंदिराचा जीर्णोद्धार केला असून आता मोठा सभा मंडप उभारून गोर गरीब लोकांच्या शुभ कार्याची व्यवस्था केली आहे. गुजराथी समाजाची येथे दर्शनाला मोठी गर्दी असते.

**-विजय मांडे, कर्जत**



## बदलते तंत्रज्ञान

# यु ट्युब चॅनल ठेवा असे सुरक्षित, होणार नाही हॅक

जर तुमच्या **यु ट्युब** चॅनलचेसुद्धा लाखो सबस्क्राइबर्स असतील किंवा भविष्यात तुम्हाला युट्युबच्या माध्यमातून तुमचे करिअर चालू करायचे असेल तर तुम्हाला जास्त सावध राहण्याची गरज आहे. हॅकर्स अनेकदा नवीन आणि जुन्या चॅनलला लक्ष्य करतात. एकदा तुमचे **यु ट्युब** खाते हॅक झाल्यानंतर तुम्ही तुमच्या चॅनलमध्ये प्रवेश करू शकणार नाही.हॅकर्स तुमचे **यु ट्युब** चॅनल कंट्रोल करू शकतात. तसेच ते विकू किंवा जाहिरात कमाईसाठी वापरू शकतात. एकदा का तुमचे **यु ट्युब** चॅनल हॅक झाले की मग तुम्ही तुमचे चॅनल लॉग इन करू शकणार नाही. यासह, तुमच्या **यु ट्युब** चॅनेलचे डिस्क्रिप्शन, प्रोफाइल पिक्चर, **यु ट्युब** हॅंडल आणि इतर माहिती बदललेली दिसेल.




जर तुमचे अकाउंट हॅक झाल्यानंतरही लॉग इन होतं असेल, तर तुम्हाला सर्वप्रथम तुमचा पासवर्ड बदलणे आणि सर्व डिव्हाइसेसवरून अकाउंट लॉगआउट करणे आवश्यक आहे. अकाऊंटचा पासवर्ड कसा बदलायचा?

स्टेप १. सर्व प्रथम तुम्हाला ब्राउझरमध्ये **गुगल** अकाउंट लॉग इन करावे लागेल.

स्टेप २. **गुगल** प्रोफाइल फोटोवर क्लिक करून, तुम्हाला Manage your Google Account वर टॅप करावे लागेल.

स्टेप ३. येथे तुम्हाला सिक्युरिटीवर टॅप करा आणि **गुगल** वर साइन इन करा.

स्टेप ४. येथे पासवर्ड पर्याय निवडल्यानंतर, तुम्हाला तुमचा नवीन पासवर्ड टाकावा लागेल. स्ट्रॉंग पासवर्ड ठेवण्याचा प्रयत्न करा.

**सर्व डिवाइसमधून लॉगआउट कसे करावे?**

स्टेप १. सर्वप्रथम, तुमच्या **गुगल** अकाउंट लॉग इन करा.

स्टेप २. **गुगल** प्रोफाइल चिन्हावर क्लिक करा आणि Manage your Google Account वर जा.

स्टेप ३. येथे तुम्ही सिक्युरिटी आणि युवर डिव्हायसेस या पर्यायावर टॅप कराल.


स्टेप ४. युवर डिव्हाइसेस पर्यायाच्या अंतर्गत, तुम्हाला सर्व डिव्हाइसेसची सूची मिळेल ज्यामध्ये तुमचे अकाउंट लॉग इन आहे. येथून जी डिवाइस तुम्हाला नसेल ती रिमूव्ह करा.

# थोर समाजसुधारक हमीद दलवाई

हमीद उमर दलवाई हे समाजसुधारक व मराठी साहित्यिक होते. एक साहसी, तत्त्वनिष्ठ आणि आधुनिक विचारांचे प्रतीक होते. त्यांनी मुस्लिम समाजातील रूढीवादी मानसिकतेला आव्हान देत, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण, आणि धर्मनिरपेक्षतेसाठी अखंड संघर्ष केला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेतून त्यांनी आधुनिकतेचा नवा अध्याय लिहिला.

त्यांचा जन्म मिरजोळी, तालुका, चिपळूण येथे २९ सप्टेंबर १९३२ रोजी झाला दलवाई यांचे माध्यमिक शिक्षण चिपळूणमध्ये तर पुढील शिक्षण मुंबईत रुपारेल व इस्माईल युसुफ या महाविद्यालयांत झाले. हमीद यांनी महात्मा जोतिराव फुले याच्या प्रभावामुळे संघटनेची स्थापना केली

मुस्लिम समाजसुधारणेच्या उद्देशाने त्यांनी इ.स. १९७० मध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापले. मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचा व भाषा माध्यमाचा प्रश्न, मुसलमानांचे मराठी साहित्य, मुस्लिम समाजात आधुनिक विचार प्रसाराचे प्रयत्न अशा अनेक प्रश्नांवर हे सत्यशोधक मंडळ काम करत आले आहे.हमीद दलवाई यांनी इ.स. १९६६ मध्ये सात मुसलमान महिला घेऊन मुंबईतील कौन्सिल हॉलवर मोर्चा काढला. मुसलमानांमधील तोंडी तलाक,



## निमित्त


बहुपत्नीत्व आदींमुळे त्यांच्यामधील स्त्रियांची होणारी घुसमट सरकारसमोर आणावी हा या मोर्चाचा हेतू होता. मुसलमान स्त्रियांचा हा बहुधा पहिलाच मोर्चा असावा. महंमद पैगंबरांचे जीवन, तसेच कुराण-हदीस यांबद्दल मोकळी, सविस्तर चर्चा मुस्लिम समाजात व्हावी, अशी त्यांची इच्छा होती. अशा चर्चेमुळे मुस्लिम समाजातील साचलेपणा दूर व्हावा, आचार-विचारात उदारता यावी, तसेच प्रबोधनाचे प्रवाह सुरू व्हावेत यासाठी हमीद दलवाईंनी आपले आयुष्य वेचले.


त्यांच्या शेवटच्या आजारातही त्यांनी स्वस्थ न बसता 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' नावाचे पुस्तक लिहिले. हे लेखन प्रामुख्याने भारतीय मुसलमानांच्या धार्मिक प्रवृत्ती, राजकारण, त्यांचे राजकीय नेतृत्व, पाकिस्तानची चळवळ आणि उद्दिष्टे, हिंदुत्ववाद या विषयांवर आहे.

त्यातील तपशील, तपशिलांमागील अर्थ, उद्याच्या भारतासाठी बदलाची गरज यांसंबंधीचे पुस्तकातील विवेचन वाचल्यावर हमीद दलवाईंच्या प्रबोधनविषयक दृष्टीची कल्पना यावी. समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या कोणाही दृष्ट्या नेत्याला होतो, त्यापेक्षा कितीतरी जास्त विरोध दलवाईंना झाला.हमीद दलवाई हे रॅशनल भूमिका घेणारे कृतीशील विचारवंत होते. राष्ट्रीय एकात्मता हे अंतिम उद्दिष्ट मानणारे,मुस्लिम समाजातील सुधारणांना बळ देण्यासाठी निर्भीडपणे अनेक प्रबोधन-कृती कार्यक्रम राबविणारे सामाजिक क्रांतीरिक हमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातून वैचारिक लढा उभारला.

धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही ही दोन मूल्ये दलवाईंच्या विचारांच्या केंद्रस्थानी होती. परंपरावादाला नकार आणि ऐहिकतेचा स्वीकार यांचा पुरस्कार करणाऱ्या या मेकर्स ऑफ मॉडर्न इंडियात त्यांना मानाचे स्थान आहे. ३ मे १९७७ रोजी त्यांचे निधन झाले. हमीद दलवाई यांना अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशनने २०१७ सालच्या जानेवारीमध्ये जीवनगौरव पुरस्कार दिला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# चिकन-मटणपेक्षा 'या' ड्राय फ्रूटमध्ये जास्त व्हिटॅमिन

व्हिटॅमिन बी १२ शरीरासाठी महत्त्वाचे असते. शाकाहारी लोकांमध्ये त्यांची कमतरता असते. व्हिटॅमिन बी १२ हे मांसाहारी पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात आढळते, परंतु काही ड्रायफ्रुट्समध्येही याचे प्रमाण चांगले असते. व्हिटॅमिन बी १२च्या कमतरतेमुळे शरीर कमकुवत होऊ शकते. व्हिटॅमिन बी १२चे चांगले स्रोत कोणते ड्राय फ्रूट आहेत ते जाणून घ्या...



मनुका म्हणजे किसमिस. हेसुद्धा व्हिटॅमिन बी १२चे चांगले स्त्रोत आहेत. रात्री मनुका भिजवून सकाळी त्या खाल्यामुळे त्याचा चांगला फायदा होतो. किसमिस इतर ड्राट फ्रूटच्या तुलनेत स्वस्तसुद्धा असतात. मनुका खाल्यामुळे हाडे अधिक मजबूत होतात.

खजूरमध्ये नैसर्गिक गोडवा असतो. हा पदार्थ चविष्टसुद्धा आहे. यामध्ये व्हिटॅमिन बी १२देखील चांगले असते आणि विविध पदार्थांमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. उपवास असताना अनेक वेळा खजूरचे सेवन केले जाते. खजूर खाल्यामुळे मेंद अधिक तल्लख होतो.

काजू हे व्हिटॅमिन बी १२चे मौल्यवान स्त्रोत आहेत. हे बऱ्याचदा स्नॅक म्हणून खाल्ले जातात. तसेच विविध पदार्थांमध्ये त्याचा वापर केला जातो. काजूचा वापर केल्यामुळे तुमचा आहार एक स्वादिष्ट आणि पौष्टिकसुद्धा होतो.

पिस्ता केवळ स्वादिष्टच नाहीत तर त्यामध्ये व्हिटॅमिन बी १२चे प्रमाणदेखील चांगले आहे. ते स्नॅक म्हणून, सॅलड टॉपिंग म्हणून किंवा दही किंवा डेझर्टमध्ये मिसळून खाल्ले जाऊ शकतात. पिस्तामध्ये फाइबर मुबलक प्रमाणात असते.

बदामात व्हिटॅमिन बी १२च्या लक्षणीय आहे. बदाम खाण्याचे अनेक फायदे आरोग्याला होतात. नास्तामध्ये किंवा सॅलड्स, दही किंवा मिष्टान्नमध्ये बदाम टाकून खातात. भारतात बदामाचे उत्पादन पुरेसे नसल्याने त्याची अफगाणिस्तान व इराण येथून आयात होते.

भोपळ्याच्या बियांमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ असते, तसेच इतर आवश्यक पोषक तत्वांचा त्यामध्ये समावेश असतो. आपल्या रोजच्या आहारात भोपळ्याच्या बियांचा समावेश करा किंवा स्नॅक म्हणून खा. याशिवाय सूर्यफुलाच्या बिया, अंजीर, अक्रोड यामध्येही बी १२ असते. अशा प्रकारे हे पदार्थ खाल्यास व्हिटॅमिन बी १२ची शरीरातील गरज आपण भरून काढू शकतो.

# कर्जत शहरातील नागरिकांना शास्ती माफी; अभय योजना जाहीर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांच्या मालमत्ता करामधून शास्ती माफी मिळावी हा निर्णय लागू होण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी राज्य सरकारांकडे पाठपुरावा केला. त्यासाठी माजी नगरसेवक संकेत भासे यांच्याकडूनही सतत पाठपुरावा सुरु होता. या पाठपुराव्याला यश आले. त्यामुळे कर्जत शहरातील नागरिकांचे हजारो रुपयांचे नुकसान टळले आहे.



राज्य सरकारने करदात्यांना शास्तीमधून माफी मिळावी यासाठी अभय योजना जाहीर केली होती. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांच्या सुचनेनुसार माजी नगरसेवक संकेत भासे यांच्याकडून निवेदन देण्यात आले. नगरपरिषदेकडून घरपट्टी (मालमत्ता कर) आकारणी नियमित केली जाते. मात्र एखाद्या वर्षी किंवा अनेक वर्षे कर न भरल्यास थकबाकीवर दरमहा दोन टक्के दंड आकारला जातो. कोरोनाच्या काळातील आर्थिक संकट, बंद पडलेले व्यवसाय आणि बिकट परिस्थितीमुळे अनेक नागरिक कर भरू शकले नाहीत परिणामी थकबाकी आणि त्यावरील शास्ती मोठ्या प्रमाणात वाढली. राज्य शासनाने १९ मे २०२५ रोजी परिपत्रक काढून मालमत्ता करावरील दंड माफ करण्याच्या सूचनांसह अभय योजना लागू करण्याचा निर्णय घेतला होता.

कर्जत नगरपरिषदेत या योजनेची अंमलबजावणी अनेक महिन्यांपासून प्रलंबित होती. या विलंबा बाबत भासे यांनी वारंवार मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन देत पाठपुरावा करीत होते तसेच भारतीय जनता पक्षाकडून सुनील गोगटे यांच्याकडूनदेखील शास्ती माफ व्हावी. असा मागणी पत्राद्वारे केली होती.

कर्जत नगरपरिषदेत मालमत्ता करावरील शास्ती माफी व अभय योजना लागू करण्यात आली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या पुढाकारातून आणि भासे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही योजना कर्जत नगरपालिकेत प्रत्यक्षात राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आमदार थोरवे यांनी या अभय योजनेचा लाभ कर्जत शहरातील नागरिकांसाठी व्हावा यासाठी प्रयत्न केला आणि त्यानंतर अभय योजना कर्जत नगरपरिषदेची लागू झाली आहे. कर्जत नगरपरिषद प्रशासनाने योजना राबविण्याचा निर्णय घेतला.

२४ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नगरपरिषद कर विभागात अर्ज स्वीकारले जाणार असून १९ मे २०२५ पर्यंतच्या मालमत्ता करावरील थकबाकीवरील शास्ती पूर्णपणे माफ केली जाणार आहे, असे सांगण्यात आले.

# 'वकील होण्याआधी चांगला माणूस असणे गरजेचे'



**खोपोली : प्रतिनिधी**

ज्ञानाची तहान,गुरूवरची निष्ठा, सतत काहीना काही नवीन शिकण्याची तत्परता,एकाग्रता आणि महत्वाकांक्षा हे पाच गुण विद्यार्थ्यांमध्ये असतील तर चांगला विद्यार्थी घडू शकतो व यशस्वी होतो . वकील होण्याआधी चांगला माणूस असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या अँड. वर्षा घारे यांनी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ विधी महाविद्यालय २०२५ -२६ या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ बी.एल.पाटील तंत्रनिकेतनच्या सभागृहात झाला.यावेळी विधी महाविद्यालयाचे अध्यक्ष नरेंद्र शहा,देवन्हावे श्री.छत्रपती विद्यालयाचे अध्यक्ष भास्कर लांडगे,प्राचार्या.अँड वर्षा घारे,प्रा.अँड.तनिष्का देशमुख, प्रा.अँड.मेघना पोळेकर उपस्थित होते.यावेळी अध्यक्ष नरेंद्र शहा यांच्या शुभहस्ते मागच्या वर्षी विविध स्पर्धांमधील गुणवंत स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या संचालकांनी पाठपुरावा केल्यानंतर विधी महाविद्यालयाला परवानगी मिळाली.त्यावेळी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर पूर्ण सुविधा देण्यासाठी काहीअंशी कमी पडलो यासंबंधी प्रामाणिकपणे सांगतो.पण पुढील काळात विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कायम प्रयत्न करेल असे अश्वासन अध्यक्ष नरेंद्र शहा यांनी देत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# पेणमध्ये रायगड फोटो एक्स्पो-२५

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडीओ ग्राफर्स असोसिएशन च्या वतीने जिल्ह्यातील फोटोग्राफर्सना नवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे, फोटोग्राफी संदर्भात लागणाऱ्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्या या उद्देशाने सलग दुसऱ्या वर्षी 'रायगड फोटो एक्स्पो २५' चे आयोजन करण्यात आले होते.



पेण येथिल मराठा समाज हॉल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या एक्स्पोचे उदघाट्न जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर जी. एस. हरळय्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, शिवसेनेचे तालुका प्रमुख समीर म्हात्रे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, पेण च्या माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी असोसिएशनचे संस्थापक विवेक सुभेकर, अध्यक्ष समीर भायदे, उपाध्यक्ष समीर मालोदे, सचिव आनंद नींबरे, सहसचिव दीपक बडगुजर, खजिनदार जितेंद्र मेहता, कार्यकारिणी सदस्य अविनाश राऊत, अनिरुद्ध जोशी, सुशिल घाटवळ, निलेश शिर्के, सल्लागार दादा आर्ते, एक्स्पो च्या आयोजनासाठी मेहनत घेणाऱ्या पेण फोटोग्राफर असोसिएशन चे अध्यक्ष समाधान पाटील, उपाध्यक्ष संदीप म्हात्रे, सर्व असोसिएशन चे अध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबई, पुणे, ठाणे येथिल निकॉन, कॅनॉन, फ्युजिफिल्म, रॉयल अल्बम, प्रिंटर, फ्रेम्स, बेबी शूट क्रॉप्स, थ्रीडी बॅग्राऊंड अशा फोटोग्राफी संदर्भात विविध प्रकारचे १८ स्टॉल उपलब्ध करण्यात आले होते. या एक्स्पोचे खास आकर्षण म्हणून रायगड फोटो सुदंरी नावाने फॅशन शोचे देखील आयोजन करण्यात आले होते.

ज्येष्ठ छायाचित्रकार प्रकाश सकपाळ, पराग गुप्तन, फोटोग्राफी प्रशिक्षक श्री.पराग शिंदे, महेश तावरे यांचा असोसिएशन च्या वतीने सन्मान करण्यात आला. 'रंगोत्सव २०२५' या फोटोग्राफी स्पर्धे तील विजेत्या स्पर्धकांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

पेण, अलिबाग, पोयनाड, मुरूड ,रोहा, पाली, नागोठणे, खोपोली, कर्जत, नेरळ, माणगाव, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, उरण , रसायनी फोटोग्राफर्स असोसिएशन मधून ४६५ फोटोग्राफर्सनी या एक्स्पो ला भेट दिली.हा एक्स्पो यशस्वी करण्यासाठी पेण फोटोग्राफर्स असोसिएशन ने मेहनत घेतली.

# अष्टमीकरांच्या एकीमुळे भव्य मंदिर साकारण्यात यश

**रोहे: प्रतिनिधी**

बापदेव महाराज मंदिर हे सखल भागात असल्यामुळे अनेक अडचणीचा सामना करत दर्शनाला यावे लागत होते. आपले ग्रामदैवत असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा ही भावना ग्रामस्थांनी खा. सुनिल तटकरे यांचे कडे व्यक्त केली. त्यानंतर आज भव्य व देखणे मंदिर करण्यात आपण यशस्वी झालो. यामध्ये आम्ही तटकरे कुटुंबीय नाममात्र आहोत खऱ्या अर्थाने राजकारण विरहित अष्टमी गावकीच्या एकीमुळे हे मंदिर साकरण्यात यश मिळाले आहे.आता यापुढेही येथे हायमास्ट दिवे, रस्ता, वेशिवरील कालकाई मंदिर उभारण्यात सर्वोतोपरी मदत करण्यात येईल असे आश्वासन माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी बापदेव मंदिर येथे बसविण्यात आलेल्या सोलर पॅनल व सिसिटीव्ही यंत्रणा लोकार्पण प्रसंगी दिले.



तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट यांचे सहकार्याने सिसिटीव्ही व माजी नगरसेविका नेहा नितीन पिंपळे यांचे सहकार्यातून बसविण्यात आलेल्या ३ केव्ही सोलर पॅनल चे लोकार्पण त्यांचे प्रमुख उपस्थितीत शनिवार २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी झाल्यानंतर ते उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव युवा नेते संदीप तटकरे, विश्वस्त ऋतुजा तटकरे,माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, समीर शेडगे, ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष महादेव साळवी, सामाजिक कार्यकर्ते नितीन पिंपळे, आप्पा देशमुख, महेंद्र गुजर, मयूर दिवेकर, नवरात्र उत्सव कमिटी अध्यक्ष सचित साळवी, रवी चाळके, प्रशांत देशमुख, प्रसाद खुळे, शिवराम बडे, गौरव बडे, हरेश पिंपळे,नीता हजारे, महेश मिस्त्री, राजेश देवळेकर,हर्षद साळवी,अभिजित लुमन, कुणाल पिटनाईक, राहुल भोबड,केदार साळवी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

तटकरे ट्रस्टचे सचिव संदीप तटकरे यांनी बोलतांना अष्टमी गावाशी आपले जिव्हाळ्याचे ऋणानुबंध आहेत. आज या माध्यमातून बापदेव महाराजांची सेवा करण्याचे भाग्य लागले याचे समाधान वाटते.

## रोडवर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करा

**रसायनी :** मोहपाडा बाजारपेठेतील भाजी विक्रेते फेरीवाले आणि व्यावसायिक आपला सर्व कचरा मोहपाडा येथील मुख्य रस्त्यावरील मुतारीच्या समोर टाकून देतात वासांबे मोहपाडा ग्रामपंचायतीने तेथे कचरा टाकणारा कडक कारवाई करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.


## नमुना एन. डी.
## (नियम ९२ (३) पहा)

**परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. 5303/PNL/98 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46.BP3936 चे मालक इस्माईल इब्राहीम शेख यांचे तारीख १२/०५/२०२४ रोजी निधन झालेले आहे.

मी, शबनुर इस्माईल शेख, पत्ता : कॅनरा बँक समोर पळस्पे फाटा, पारपुंड, मुंबई पुणे रोड ता. पनवेल,जि. रायगड ४१०२०६

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव : शबनुर इस्माईल शेख**
**पत्ता :** कॅनरा बँक समोर पळस्पे फाटा, पारपुंड, मुंबई पुणे रोड ता. पनवेल,जि. रायगड ४१०२०६


# पेण बसस्थानकात पोलीस चौकीचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

वेगवेगळ्या भूमिकेतून गुन्हेगारी प्रवृत्तीवर वचक ठेवण्याचे काम पोलिस बांधव करीत असतात असे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी पेण एसटी बसस्थानक येथे उभारण्यात आलेल्या पोलीस चौकीचे उद्धाटन कार्यक्रमाप्रसंगी केले.



बसस्थानकात वारंवार होणाऱ्या चोऱ्या आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसावा, तसेच नागरिकांना अधिक सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी ही चौकी उभारण्यात आली या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचा यावेळी पोलीस विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. रामेश्वर कन्स्ट्रक्शनचे राजू पिचिका यांच्या सौजन्याने चौकी उभारणीसाठी मोठे सहकार्य लाभल्याने त्यांचा रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीद वाक्य घेऊन पोलिस बांधव आपल्या सेवेत कायम असून नागरिकांनीही कायदा सुव्यवस्थेबाबत आपल्या काही समस्या असतील त्याबाबत संबंधित पोलिस ठाण्याला कळव्याव्यात तसेच काही सूचना असतील त्याही सांगाव्यात जेणेकरून येथे आमचा पोलिस अधिकारी योग्य ते उपाययोजना करतील असे त्या शेवटी म्हणाल्या.

या कार्यक्रमाला पेण पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, दादर पोलीस निरीक्षक संजय ब्राह्मणे,पोलिस निरीक्षक संतोष जाधव, सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश राजपूत, पोलिस उपनिरीक्षा विक्रम नवरखेडे, रायगड एसटी विभाग नियंत्रक, एसटी आगार प्रमुख अपर्णा वर्तक, पेण न.प. मुख्यधिकारी जीवन पाटील उद्योजक राजू पिचिका, दिपश्री पोटफोडे, मुस्कान झटाम शांतता कमिटी सदस्य, पोलीस पाटील, स्थानिक नागरिक, पत्रकार, पोलिस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळा येथे पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे तळा तालुक्यात जनजीवन विस्कळित झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.त्याच बरोबर आतातोंडासी आलेले भाताच्या पिकांना मोठा धोका होण्याची शक्यता आहे.


भारतीय हवामान दिलेल्या आंदाजा नुसार रायगड जिल्ह्याला२८सप्टेंबरच्या सकाळी ३ वाजल्या पासून रेड अलर्ट जारी केला आहे.

## भातशेतीला धोका

त्या अंदाजा नुसार मुसळधार पाऊस पडला आहे.या पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यातील भात शेती चांगली तयार झाली असून काही काळावधीतच कापणी लायक होणार आहे.त्याच बरोबर सध्या भाताचे पिक कणीस बाहेर टाकत असून यावेळी हा पाऊस पडत असल्याने कणीस दाणेदार होण्यास धोका आहे. त्यातच या पावसामुळे हे पिक शेतात कोससळण्याचा धोका असल्याने शेतकरीवर्ग चिंतेत सापडला आहे.हा पाऊस कधी कमी होईल या कडे डोळे लागले असून निसर्ग राजा आतातरी आमच्या वरती कृपा करून पाऊस कमी व्हावे अशी विनवणी निसर्ग व ईश्वराकडे करत आहे.सध्या पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. नागरिकांनी आपली काळजी घ्यावी आवाहन केले आहे.



# रानबाजिरे डॅम ते लोहारे पुलापर्यंत रिव्हर राफ्टिंग सुरू



**पोलादपूर: प्रतिनिधी**

पोलादपूरच्या दरीडोंगराच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीला निसर्गसंपन्नतेची जोड असून या दूर्गम डोंगराळ तालुक्यात पर्यटन विकासाला तसेच व्यवसायांना युवावर्गाच्या मदतीने मंत्री ना.गोगावले आणि राज्यसरकारमार्फत चालना देण्यात येईल, अशी ग्वाही शिवसेनेच्या युवा सेना कोअर कमिटीचे सदस्य विकास गोगावले यांनी दिली.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील धरणालगतच्या पुलालगत नरवीर ॲडव्हेंचर्स ॲण्ड स्पोर्टसचे उद्योजक रामदास कळंबे यांच्या रिव्हर राफ्टींगच्या या साहसी खेळाचा शुभारंभ विकास गोगावले यांच्याहस्ते रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी विकास गोगावले बोलत होते. याप्रसंगी तहसिलदार कपिल घोरपडे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, नगरसेवक सिध्देश शेठ, दत्ता मोरे, शहरप्रमुख सुरेश पवार, शैलेश उतेकर, उपस्थित होते.याप्रसंगी विकास गोगावले यांनी, घागरकोंडच्या झुलत्या पुलापासून पोलादपूर तालुक्यातील कोणते पर्यटन स्थळ विकासित करून तरूणांसाठी रोजगार निर्मिती करण्याची भूमिका पुढे आली तर त्याकामी अवश्य सहकार्य करू, अशी ग्वाही दिली.


## नमुना एन. डी.
## (नियम ९२ (३) पहा)

**परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. 1021/TAXI/PNL/97 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46.BB8569 चे मालक संभाजी रामचंद्र बनसोडे यांचे तारीख ३१/०८/२०२५ रोजी निधन झालेले आहे.

मी, मंगल संभाजी बनसोडे, पत्ता : तेजमेय सोसायटी बि.नं. ई -११६ रुम नं ०४ सेक्टर ७ नवीन पनवेल ता. पनवेल,जि. रायगड ४१०२०६

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव : मंगल संभाजी बनसोडे**
**पत्ता :** तेजमेय सोसायटी बि.नं.ई -११६ रुम नं ०४ सेक्टर ७ नवीन पनवेल ता. पनवेल,जि. रायगड ४१०२०६

# वसई जूचंद्र येथे कर्मवीर जयंती

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यालयासाठी ५० लाखांची देणगी

**वसई : प्रतिनिधी**

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एस पी जुनिअर कॉलेज, जुचंद्र तालुका वसई येथे पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३८वा जयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाला नवीन इमारत बांधण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ५० लाखांची देणगी जाहीर केली.



या सोहळ्यास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन व कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड विभागाचे चेअरमन बाळाराम पाटील, गव्हाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, जनरल बॉडी सदस्य विनय पाटील, रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे तसेच विद्यालयाचे प्राचार्य तथा सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप आदी उपस्थित होते.

या वेळी रांगोळी प्रदर्शन व 'अण्णांचे स्वप्न...वाटचाल पूर्णत्वाकडे' या उपक्रमांतर्गत अण्णांचे भावविश्व व रयतेची गगनभरारी या देखाव्यांचे उद्घाटन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या रोबोट्सचे खूप कौतुक केले. यानंतर डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य व सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांनी केले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालय व ग्रामस्थांमार्फत देण्यात येणारा कर्मवीर पुरस्कार २०२५ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना देण्यात आला तर आदर्श शिक्षक कर्मवीर पुरस्कार २०२५ हा मानसी साळुंखे यांना देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य विलासराव जगताप सर तसेच विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. रयत शिक्षण संस्था भविष्यामध्ये तांत्रिक दृष्ट्या स्वतंत्र असेल, असे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी हाती घेतलेल्या नवनवीन उपक्रमांची माहिती दिली.

रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे, वटवृक्षाचा विशालतेचा मोह नभाला पडतो आहे या पंक्तीप्रमाणे रयत शिक्षण संस्थेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या उपक्रमामुळे आधुनिक युगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी सज्ज होत आहेत आणि यामुळे रयत शिक्षण संस्थेचा मोह पूर्ण महाराष्ट्राला पडेल, अशी सदिच्छा चंद्रकांत दळवी यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक संजय म्हात्रे यांनी मानले तर सूत्रसंचालन जान्हवी भोसले यांनी केले.

# बीसीटी लॉ कॉलेजमध्ये सहज योग ध्यान सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉ च्या आरोग्य समितीने शनिवारी (दि.२७) सकाळी १०:३० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सहज योग ध्यान कार्यशाळेचे यशस्वीरित्या आयोजन केले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना मन, शरीर आणि आत्मा संतुलित करण्यासाठी ध्यान हे एक साधन आहे याची ओळख करून देणे आणि तरुणांमध्ये समग्र कल्याण वाढवणे हा होता.



सत्राची सुरुवात बी.ए.एल.एल.बी.च्या चौथ्या वर्षाच्या विद्यार्थिनी सुश्री आर्या कानडे यांच्या हार्दिक स्वागताने झाली, त्यानंतर सहज योग ध्यान पथकाने प्रास्ताविक भाषण दिले. वक्त्यांनी ताणतणाव व्यवस्थापित करण्यासाठी आणि एकाग्रता वाढविण्यात ध्यानाचे महत्त्व स्पष्ट केले, तसेच विद्यार्थ्यांना ते त्यांच्या जीवनशैलीचा एक भाग म्हणून स्वीकारण्यास प्रोत्साहित केले.

प्राचार्य डॉ. सान्वी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आरोग्य समितीच्या प्रभारी सहाय्यक प्राध्यापक शिल्पा नागावकर यांच्या समग्र समन्वयाने आयोजित करण्यात आला. कार्यशाळेच्या यशासाठी त्यांचे सहकार्य महत्त्वाचे होते.

त्यानंतर प्रशिक्षकांनी एका मार्गदर्शित ध्यान सत्राचे नेतृत्व केले, जिथे विद्यार्थ्यांनी आराम, आत्म-जागरूकता आणि आंतरिक सुसंवाद साधण्यासाठी सहज योगाच्या तंत्रांचा सराव केला. या सत्रामुळे त्यांना शांत, ताजेतवाने आणि उत्साही वाटले असे सहभागींनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप चौथ्या वर्षाचे बी.एल.एल.बी. विद्यार्थी तपनमोहन करवीर यांनी आभार मानले. त्यांनी प्राचार्य, प्राध्यापक, सहज योग टीम आणि विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाबद्दल त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

ही कार्यशाळा एक अर्थपूर्ण आणि समृद्ध अनुभव म्हणून कौतुकास्पद होती, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत ध्यानाचा समावेश करण्यास प्रेरित केले गेले.

# माहिती अधिकार दिन २९ सप्टेंबर रोजी साजरा करण्याचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठातर्फे राज्य शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' म्हणून साजरा केला जातो. मात्र यावर्षी २८ सप्टेंबर हा दिवस रविवार असल्याने माहिती अधिकार दिन सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठाच्या उप सचिव व कार्यालय प्रमुख रीना फणसेकर यांनी दिली आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी करताना सर्व शासकीय कार्यालयांनी माहिती अधिकार दिनानिमित्त विशेष उपक्रमांचे आयोजन करावे, असे निर्देश सर्व कार्यालयांना देण्यात आले आहेत.

माहिती अधिकार कायदा, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच पारदर्शक, जबाबदार व लोकाभिमुख शासन व्यवस्था नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या दिनाचे विशेष महत्त्व असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. माहिती अधिकार कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम, जनजागृती उपक्रम, परिसंवाद, कार्यशाळा व मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सोमवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी सर्व शासकीय कार्यालयांनी हा दिन औपचारिकरीत्या साजरा करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठाच्या उप सचिव व कार्यालय प्रमुख रीना फणसेकर यांनी केले आहे.

# नशामुक्त कळंबोलीसाठी विसपुते कॉलेजचा पुढाकार

**कळंबोली : बातमीदार**

जागतिक फार्मासिस्ट दिन च्या निमित्ताने २५ सप्टेंबर २०२५ रोजी कळंबोली केमिस्ट असोसिएशन, कळंबोली पोलीस स्टेशन आणि विसपुते फार्मसी कॉलेज, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त कळंबोली जनजागृती अभियान राबवण्यात आले.

या अभियानांतर्गत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० वाजता नवीन सुधागड स्कूल येथून सुरुवात होऊन रॅलीचा समारोप आई माता मंदिर, कळंबोली येथे करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे आणि अमली पदार्थांच्या वापराबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

यानिमित्ताने आयोजकांनी समाजाला व्यसनमुक्त ठेवण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले. अमली पदार्थांपासून दूर रहा, आयुष्य सुंदर करा या घोषवाक्याद्वारे अभियानाचा सकारात्मक संदेश दिला गेला.



# मोहोपाड्यात मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील अचानक कला, क्रीडा मंडळ,श्री गणेश युवक मंडळ, आरोग्य विभाग रायगड जि.परिषद व लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे मोहोपाडा आरोग्य उपकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अचानक क्रीडा मंडळ आयोजित नवरात्री उत्सवात मुख्य बाजारपेठ शिवाजी चौकात शुक्रवारी (दि.२६) स्वस्थ नारी-सशक्त परिवार अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर झाले.

शिबिरात महिलांची रक्तदाब, रक्तशर्करा, हिमोग्लोबिन, गर्भाशय व स्तनाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी करण्यात आली. एकूण ४५ हून अधिक महिला व पुरूष नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. अचानक कला क्रीडा मंडळ व श्री गणेश युवक क्रीडा मंडळाच्यावतीने आयोजित आरोग्य तपासणी शिबिर मोहोपाडा परिसरात पुन्हा आयोजित करावे, अशी मागणी बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी केली.



**नवीन पनवेल :** गेली २१ वर्षे रामशेठ ठाकूर विचार मंचच्या वतीने नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. महापालिकेचे माजी सभापती संतोष शेट्टी, श्वेता शेट्टी आणि मंडळाचे अध्यक्ष किशोर चौतमोल यांच्या प्रयत्नातून हा उत्सव दरवर्षी आयोजित केला जातो. दांडिया रसिकांच्या विशेष पसंतीस उतरलेल्या या उत्सवात तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येतो.



**मुंबई : सायन चुनाभट्टी येथील माँ जगदंबा मित्र मंडळात देवीची कुंकुमार्चन सेवा करणाऱ्या महिला.**

# उरण येथील युईएस कॉलेजमध्ये महिला कायदेविषयक व्याख्यान



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण शहरातील यु.ई.एस.कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजीच्या महिला विकास कक्षेतर्फे महिला कायद्याविषयक व्याख्यानाचे आयोजन २७ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून यु. ई.एस. संस्थेच्या सहसचिव ॲड.अपूर्वा ठाकूर होत्या. त्यांच्या समावेत सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच प्राध्यापकवर्ग आणि विदयार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

या वेळी ॲड.अपूर्वा ठाकूर यांनी विदयार्थ्यांना तसेच उपस्थितीतांना महिलाचे अधिकार व कायद्या संबंधित मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुण्यांनी विदयार्थ्यांना केलेल्या अमूल्य अशा मार्गदर्शनाबद्दल सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ.मिनाक्षी गुप्ता त्यांचे आभार व्यक्त करून यु.ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी मध्ये महिला कायदेविषयक व्याख्यान झाले.

## दुर्गामाता दौड (माळ सातवी)





**पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत रविवारी चार ठिकाणी दुर्गामाता दौड काढण्यात आली. पहिली दौड ही या वर्षी प्रथमच वाजे गावात काढण्यात आली. वाजे ग्रामपंचायतीपासून ही दौड सुरू करण्यात आली. नंतर गावातील हनुमान मंदिर व जोगेश्वरी देवीच्या मंदिरात जाऊन देवीची आरती करण्यात आली आणि सुरुवातीच्या ठिकाणी येऊन दौडीची सांगता करण्यात आली. दुसरी दौड ही करंजाडे गाव आणि सेक्टर भागात काढण्यात आली. तिसरी दौड डेरवली गावात काढण्यात आली. चौथी दौड ही यंदा प्रथमच केळवणे गावात काढण्यात आली. दरम्यान, दौडमध्ये सहभागी होण्यासाठी शुभम साळुंखे (९७०२७०६२६२) यांना संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# दिव्यांग मुलांनी खेळला पर्यावरणपूरक गरबा

**नवी मुंबई : बातमीदार**

'स्वच्छता ही सेवा' या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या ईटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रामध्ये स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच सध्या सुरू असलेल्या नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून ईटीसी केंद्रातील दिव्यांग मुलांसाठी 'क्लॅप ऑन गरबा' या विशेष कार्यक्रमाचेदेखील आयोजन करण्यात आले.



या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी आवर्जून उपस्थित राहून गरबा खेळणाऱ्या सहभागी मुलांचे कौतुक केले तसेच दिव्यांग मुलांकरिता निखळ आनंददायी असा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल ईटीसी केंद्र संचालक व शिक्षकांचे कौतुक केले. ईटीसी केंद्र संचालिका डॉ.अनुराधा बाबर यांनी 'क्लॅप ऑन गरबा' मध्ये हाताने टाळी वाजवून गरबा खेळत, दांडिया न वापरता अप्रत्यक्षरित्या झाडांचे संरक्षण करण्याचा अप्रत्यक्ष संदेश प्रसारित करण्यात आला असे सांगितले. या वेळी अभियंता वैभव देशमुख उपस्थित होते. नवी मुंबई महापालिकेकडून 'स्वच्छता हीच सेवा' या उपक्रमामध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये ईटीसी केंद्रातील सर्व दिव्यांग मुला-मुलींनी गरब्याचा रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख परिधान करून या कार्यक्रमाचा उत्स्फुर्त आनंद घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन ईटीसी केंद्राचे शिक्षण व्यवस्थापक, अधिक्षक यांनी नेटकेपणाने केले.

# कन्या आरोग्यमंदिर महिला मंडळाचा ७१वा नवरात्रोत्सव

**पनवेल : वार्ताहर**

कन्या आरोग्यमंदिर महिला मंडळाच्या वतीने यंदाचा ७१वा नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि सांस्कृतिक उत्साहात श्री विरुपाक्ष महादेव मंदिर येथे साजरा करण्यात आला.

दरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये 'मनाचे श्लोक' हा भावस्पर्शी कार्यक्रम मधुरा मराठे यांनी सादर केला. 'वंदे मातरम' हा देशभक्तिपर कार्यक्रम अमित आपटे यांच्या सादरीकरणाने रंगतदार झाला. ४ ते ८ वयोगटातील लहान मुलांसाठी श्लोक स्पर्धा आयोजित करण्यात आली. मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि संस्कारांची बीजे रोवली गेली. तसेच श्रीसूक्त पठण पार पडले, त्यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.


या कार्यक्रमांना मंडळाच्या अध्यक्षा वृषाली जोशी, उपाध्यक्षा स्मिता लळीत, सचिव आदिती ओझे, सह सचिव प्रज्ञा शेंडे, कोषाध्यक्ष सुनीता परांजपे, तसेच सर्व समिती सदस्य आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत नेटकेपणाने पार पाडले. मंडळातर्फे सहभागी कलाकार, स्पर्धक आणि उपस्थित रसिक श्रोते यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.



# अतिवृष्टीकाळात नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये -तहसीलदार चव्हाण

**चौक : प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाकडून (आयएमडी) मिळालेल्या माहितीनुसार, २७ ते ३० सप्टेंबर २०२५ या काळात राज्यात पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. महसूल आणि वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार ते अतिवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.





खालापूर तालुक्यातील मोरबे धरण, कलोते, भिलवले, डोनवत व खरसुंडी वळण बंधारा हे यापूर्वीच पूर्ण क्षमतेने भरले असून यापूर्वीच त्यातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. खालापूर तालुक्यातील पाताळगंगा नदीला महापूर येत असतो. मोरबे धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने त्यातूनही पाणी सोडले जाण्याची शक्यता आहे. खालापूर तालुक्यातील काही दुर्गम भागात दरड कोसळण्याची शक्यता असते. खोपोली येथेही दरड प्रणव क्षेत्र आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी खालापूर तालुका प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

नागरिकांनी अधिकृत सूचनांचे पालन करावे, धोकादायक आणि पूर प्रवण क्षेत्रात जाणे टाळावे, पावसाळ्यात झाडाखाली थांबणे टाळावे, तसेच नदी आणि नाल्यांच्या पुलावरून पाणी वाहत असताना रस्ता ओलांडू नये, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, अशा सूचना खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी केल्या आहेत.



**माणगाव : शारदोत्सवानिमित्त राजिप पीएमश्री शाळा उतेखोलवाडी येथील विद्यार्थ्यांना खेळासाठी स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले. या वेळी विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, शिक्षणतज्ज्ञ नामदेव खराडे, शिक्षिका शमिका आंबूर्ले, विनया जाधव, स्नेहल उतेकर, पद्माकर सांगळे उपस्थित होते.**



**रोहा : येथील बाजारपेठेत असलेल्या श्री अंबिका धाम मंदिरातील देवी.**

# महिला उद्योग उत्पादन विक्री केंद्र उभारणार -मंत्री तटकरे

**धाटाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील धाटाव, वरसे ग्रामपंचायत ठिकाणी महिला बचत गट उद्योग उत्पादन विक्री केंद्र उभारणार, ग्रामीण होतकरू महिलांच्या हाताला काम देणार, लांढर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे ठोस आश्वासन राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिले, त्या लांढर येथे आयोजित विविध विकासकामे उद्घाटन व भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होत्या.



लांढर येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व व्यायामशाळा लोकार्पण सोहळा कार्यक्रमाला माजी आमदार अनिकेत तटकरे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, कार्याध्यक्ष समीर शेडगे, सरचिटणीस सुरेश मगर, महिला अध्यक्षा प्रीतम पाटील, नेते शंकर भगत, अनिल भगत, युवक अध्यक्ष जयवंत मुंढे, सरपंच वंदना वारगुडे, उपसरपंच अरविंद मगर, सतीश भगत यांसह मान्यवर उपस्थित होते. मंदिराचे भूमिपूजन, शिवशंकर मंदिर शेड, व्यायाम साहित्य लोकार्पण या वेळी करण्यात आले.

प्रास्ताविकात शंकर भगत यांनी लांढर गावावर तटकरे कुटुंबाचे नेहमीच प्रेम राहिले, त्या प्रेमाची उतराई गावाने नेहमीच केली, आता गावचा अधिक विकास होत आहे, याबद्दल तटकरे कुटुंब यांचे आभार मानतो असे भगत म्हणाले. माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी गावातील तरुण आता एका छताखाली आले आहेत, त्यामुळे अधिक विकास साधला जाईल, गावाच्या विकासासाठी निधी कमी पडणार नाही. पुढील वर्षी याच नवरात्र उत्सवात गावच्या गाव देवी मंदिराचे लोकार्पण करू, असे आश्वासन तटकरे यांनी यावेळी दिले,

ना. आदिती तटकरे यांनी महिला सक्षमीकरण अधिक मजबुत करणार असल्याचे सांगत तुमच्या हाताला काम देणार, त्यासाठी धाटाव, वरचे ग्रामपंचायत ठिकाणी महिला उद्योग उत्पादन विक्री केंद्र लवकरच सुरू करू, असे आश्वासीत केले, लांढर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी यापुढे निधी कमी पडू देणार नाही असेही ना तटकरे यांनी उपस्थित ग्रामस्थ, महिलांना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश भगत यांनी केले.

# गणित संबोध शिष्यवृत्ती परीक्षा गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित गणित संबोध शिष्यवृत्ती परीक्षा गुणगौरव सोहळा अशोकदादा साबळे विद्यालयामध्ये सोमवारी (दि.२२) मोठ्या उत्साहात झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माणगाव तालुक्यातील उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे उपस्थित होते. तसेच अशोकदादा साबळे विद्यालयाचे मुख्याध्यापक



डी.एम.जाधव, शिपुरकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा मोरे आदी उपस्थित होते. अभिमानाची गोष्ट म्हणजे जिल्ह्यातून तिसऱ्या क्रमांकीवर माणगाव तालुक्याची उपक्रमशील तालुका म्हणून निवड झाली आहे आणि सर्व क्षेत्रात क्रियाशील व्यक्तिमत्व असणाऱ्या माणगाव तालुक्याच्या उपाध्यक्षा नेहा सतिश केकाणे यांचा उपक्रमशील शिक्षिका म्हणून मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय आणि शालेय स्तरावरील यशस्वी विद्यार्थ्यांचे सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले तसेच उपक्रमशील शाळा ना. म.जोशी विद्याभवन गोरेगाव आणि एस. एस. निकम स्कूल माणगाव या दोन शाळांचाही सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक रायगड गणित विज्ञान मंडळाच्या उपाध्यक्षा नेहा केकाणे यांनी केले. प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी शाळा व विद्यार्थ्यांना गणित संबोध परीक्षेला अधिक अधिक संख्येने बसण्यासाठी आवाहन केले आणि या उपक्रमाचे कौतुकही केले.

# शीतल गायकवाड यांना पुरस्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

कराटे व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल येथील क्रीडा शिक्षक शीतल गायकवाड यांना दिल्ली येथे केंद्रशासनाच्या स्वातंत्र्यवीर सावरकर या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संपूर्ण देशातून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दहा जणांना सन्मानित करण्यात आले यात क्रीडा क्षेत्रातील कार्याबद्दल गायकवाड यांना हा पुरस्कार देण्यात आला



दिल्ली येथील कमानी ऑडिटोरियम भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला केंद्रीय कायदामंत्री अर्जुन मेघवाल, ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, अभिषेक वर्मा, उत्तर प्रदेश रोजगारमंत्री रघुराज सिंग, विनय चौधरी जगदीश पाल, खासदार शंकर लालवणी, माजी मंत्री जनार्दन सिग्रोवाल व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार शीतल गायकवाड यांना देण्यात आला. या पुरस्काराबद्दल गायकवाड यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहेत.

# रोह्यातील नवरात्रोत्सवाची भुरळ

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन येथे सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही नवरात्र उत्सवात रोहा शहरात रोहा नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सुंदर असा संगीतावर तरुणाई ठेका धरताना दिसत असून या तरुणाईला नवरात्र उत्सवाची भुरळ पडल्याचे दिसून येत आहे.



भव्य असे आयोजन, उत्तम असे संगीत नियोजन, मोठे पटांगण, प्रेक्षकांना असं व्यवस्था या नवरात्र उत्सवाचे वैशिष्ट्य आहे. या नवरात्र उत्सव निमित्ताने समाजातील सर्वच घटकांना दररोज आरतीचा मान देण्यात येतो. दररोज ख्यातनाम गायक या नवरात्र उत्सवात आपली कला सादर करून विविध मराठी, हिंदी गाण्यांची मेजवानी देताना दिसून येत आहे. त्यामुळे या नवरात्र उत्सवातील संगीतमय कार्यक्रमाचे रोहा तालुक्यातील तरुणांना भुरळ पडल्याचे दिसून येत आहे. या नवरात्र उत्सवात रोज हजारो तरुण संगीतावर दांडिया खेळताना व ठेका धरताना दिसत आहेत. या नवरात्र उत्सवात बालगोपाळापासून तरुण, महिला विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून सामील होताना दिसत आहेत.

या दांडिया खेळ पाहण्यासाठी हजारो दांडिया रसिक येताना दिसत आहेत. खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या सुंदर असा चांगल्या नियोजनातून आयोजित करण्यात आलेल्या या नवरात्र उत्सवात महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सामाजिक राजकीय शैक्षणिक साहित्य क्रिडाकर्तुत्वान महिलांचा सन्मान करण्यात येतो.

या वेळी उपस्थित दांडिया रसिकांना कुपन देऊन यामधून लकी ड्रॉ काढण्यात येतो त्यांना योग्य, असे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देण्यात येते.


# मेहेंदळे हायस्कूल केंद्रावर शासकीय रेखाकला परीक्षा

**नागोठणे : बातमीदार**

राज्य शासनाच्या कला संचलनायामार्फत सालाबाद प्रमाणे घेण्यात येणाऱ्या शासकीय रेखाकला म्हणजेच एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा रोहा तालुक्यातील कोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहेंदळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज रोहा येथील केंद्रावर आयोजन केले असून २४ ते २७ सप्टेंबरदरम्यान ही परीक्षा होत आहे.

दरम्यान, संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी घेण्यात आलेल्या या परीक्षे अंतर्गत विद्यार्थ्यांनी वस्तू चित्र, स्मरण चित्र, कर्तव्य भूमिती आणि अक्षरलेखन या विषयावर आधारित चित्र रेखाटन करावयाची आहेत. सदर परीक्षा पास झाल्यास त्याचा लाभ दहावी बोर्ड परीक्षेत वाढीव गुण मिळवून होतो. यामुळे या परीक्षेसाठी रोहा विभागातील मराठी,इंग्रजी माध्यमांच्या शाळा तसेच जिल्हा परिषद शाळा आदींचे एकूण ८७५ परीक्षार्थी सहभागी झाले आहेत.

परीक्षेचे केंद्र संचालक मेहेंदळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य रमेश मोसे तर परीक्षा प्रमुख येथीलच कलाशिक्षक सुनिल दाभाडे काम पाहत आहेत.



# तटकरे महाविद्यालय राज्यस्तरीय सेमिनार



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव व मार्गताम्हणे एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ. तात्यासाहेब नातू कलाव वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालय मार्ग ताम्हणे यांच्या झालेल्या शैक्षणिक सामाजिक सामंजस्य करारानुसार माणगाव येथे राज्यस्तरीय संशोधनविषयक सेमिनार झाला.

कार्यक्रमास माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारी समिती सदस्य निकिता जैन (साबळे), द.ग .तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन खामकर, डॉ. नातू कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब यादव, तसेच महाराष्ट्र राज्यातील एकूण १४५ संशोधक विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष राजीव साबळे यांच्या प्रेरणेने हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी मार्गताम्हणे एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष व माजी आमदार श्री मधुकरराव चव्हाण यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे कार्यक्रमास शुभेच्छा देत सर्व संशोधकांना प्रामाणिकपणे संशोधन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे बीज भाषण मुंबई विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले आनंदीबाई प्रधान महाविद्यालय, नागोठणे येथील प्रोफेसर डॉ. श्रीकांत तुपारे यांनी करीत कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. दोन सत्रामध्ये झालेल्या या सेमिनारसाठी चार विविध शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शनासाठी उपस्थित होते. संपूर्ण मार्गदर्शन पीपीटी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून झाले.

सिद्धार्थ महाविद्यालय मुंबई येथील उप प्राचार्य व रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.नंदकिशोर चंदन यांनी संशोधनातील माहितीचे संकलन, प्राथमिक व द्वितीय माहितीचे स्त्रोत, माहिती गोळा करण्याची नियोजनबद्ध तंत्र व पडताळणी याबद्दल मार्गदर्शन केले. सीकेटी महाविद्यालय, पनवेल येथील असोसिएट प्रोफेसर डॉ. शैलेश वाजेकर यांनी संशोधन पद्धती मधील विविध प्लेगरिझम तंत्रे, इंटिग्रिटी टेक्नॉलॉजी, संपूर्ण संशोधनाची होणारी पडताळणी याबद्दल माहिती दिली. तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती येथील पदव्युत्तर संशोधन केंद्र, वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ. अजित तेलवे यांनी संशोधनातील नैतिकता, संशोधकास भेडसावणारी आव्हाने, जबाबदाऱ्या याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

# श्री धाकसुत देवस्थान परिसर सुशोभित करणार -खासदार तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांनी रोहा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या श्री धाकसुत मंदिराला भेट देऊन श्री धाकसुत महाराजांचे दर्शन घेतले. या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी या मंदिर परिसराची पाहणी केली.



या वेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, काशिनाथ धाटावकर, जितेंद्र पडवळ, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, मयूर दिवेकर, मनोहर धाटावकर, समाधान शिंदे, रवी चाळके, वसंत कोठारी, महेश नागावकर, नितीन पिंपळे, रुपेश पाटील, नितीन शिंदे आदी उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून रोहा शहरासह तालुक्यातील पर्यटन व तीर्थक्षेत्र विकसित होत आहे. याच अनुषंगाने रोहा शहरातील राम मारुती चौक मधील हनुमान मंदिर, हनुमान टेकडी यास अन्य मंदिरे विकसित होत आहेत.

रोहा शहरातील श्री धाकसुत देवस्थान परीसराची खा.सुनील तटकरे यांनी पाहणी केली. या वेळी ग्रामस्थांकडुन खा.तटकरे यांनी माहीती घेतली. श्री धाकसुत देवस्थान परीसराची सुशोभीकरण करणार असल्याचे यावेळी आश्वासन दिले.

खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून धाकसुत देवस्थान परिसर सुशोभीकरण झाले आहे. सध्या या परिसराच्या विकासकामासाठी २० लाख रुपयाचा निधी दिले असल्याचे माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर यांनी सांगितले.

# खोपोलीत नवरात्रोत्सवाची धूम शिगेला

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीत या वर्षी ३० च्या वर सार्वजनिक नवरात्र उत्सव होत आहेत. पावसाचे सावट असूनही सर्वच मंडळांच्या मंडपात दांडीया खेळाडूंची तुफान गर्दी होत आहे. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मंडळाचे कार्यकर्ते व खोपोली पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे सर्वत्र चित्र आहे.



खोपोलीतील सर्वच सार्वजनिक नवरात्र मंडळात गर्दी होत आहे. त्यातही विणानगर रहिवासी संघ आयोजित नवरात्र उत्सव, गगनगिरी मंडळ, बाजारपेठे, लोहाणा समाज मंडळ, खालची खोपोली मंडळ, शांतिनगर येथील न्यू शिवशक्ती मंडळ, पाटणकर चौकातील शिवतेज नवरात्र उत्सव, एकविरा देवी मित्र मंडळ नवरात्र उत्सवासह अन्य सर्वच नवरात्र उत्सवामध्ये दांडिया खेळाडू व रसिकांची मोठी गर्दी होत आहे. आगामी खोपोली पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षाचे नेते, संभाव्य उमेदवारांकडून मंडळ स्थळी जाऊन देवीचे दर्शन व भेटीगाठी ही जोरदार सुरू आहेत. मंडळांनी आकर्षक रोषणाई व संगीत यंत्रणेवर आधिक खर्च करुण हा उत्सव आकर्षक केला आहे. दांडीया खेळाडू आणि मंडळांचे कार्यकर्ते यांचा उत्साहही चरणसीमेला पोहचला आहे.

नवरात्र उत्सवासाठी खोपोलीत पोलीस प्रशासनाने विशेष टीम नियुक्त केली असून, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच अधिकारी व कर्मचारी जातीने लक्ष ठेवत संपूर्ण खोपोली शहरात फौज फाट्यासह गस्त घालताना दिसत आहेत.

विणानगर रहिवासी संघ नवरात्र उत्सव कमिटी अध्यक्ष तुषार देशमुख, रंजना सावंत, स्नेहा भोपतराव, साधना घोसाळकर, प्रिया डेरे, विजया पाटील, हेमलता चोगले, महादेव पवार, नरेंद्र हर्डीकर, अनिल पाटील, आनंद चोगले, पांडुरंग डेरे, मिलींद चव्हाण व अन्य पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली येथील विणानगर रहिवासी संघ आयोजित नवरात्र उत्सव निमित्ताने दैनंदिन दांडियारास सोबतच मुले, मुली व महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

यात पाक, रांगोळी, भोंडला, लहान मुलांसाठी फॅन्सी ड्रेस, नृत्य स्पर्धा सहित संगीत खुर्ची आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

# मिथुन मनहास बीसीसीआयचे नवे अध्यक्ष



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अध्यक्षपदी माजी क्रिकेटपटू मिथुन मनहास यांची अधिकृत निवड झाली आहे. मुंबईत रविवारी (दि. २८) झालेल्या बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर त्यांची अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. माजी अध्यक्ष रोजर बिन्नी यांचा कार्यकाळ मागील महिन्यात संपुष्टात आला होता, त्यानंतर ही जागा रिक्त होती.दरम्यान, मनहास यांची अध्यक्षपदी निवड ही जम्मू-कश्मीरसारख्या दुर्गम भागातील खेळाडूसाठी एक ऐतिहासिक टप्पा मानली जात आहे.

मनहास यांच्यासोबतच अन्य पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली आहे. राजीव शुक्ला यांची उपाध्यक्षपदी, देवाजित सैकिया यांची सन्माननीय सचिवपदी, तर प्रभतेज सिंग भाटिया यांची संयुक्त सचिवपदी निवड झाली आहे. मंडळाच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी ए. रघुराम भट यांच्याकडे कोषाध्यक्ष म्हणून सोपवण्यात आली आहे. जयदेव निरंजन शहा यांची 'एपेक्स कौन्सिल'चे एकमेव सदस्य म्हणून निवड करण्यात आली. अरुण सिंग धूमल आणि एम. खैरूल जामाल माजूमदार यांची गव्हर्निंग कौन्सिलमध्ये नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे.

मिथुन मनहास यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९७९ रोजी झाला. ते मूळचे जम्मू-कश्मीर राज्यातील आहेत. त्यांना राष्ट्रीय संघात स्थान मिळाले नसले तरी त्यांच्या सातत्यपूर्ण आणि परिपक्व कामगिरीमुळे ते एक विश्वासार्ह खेळाडू म्हणून ओळखले गेले. उजव्या हाताचे फलंदाज असलेल्या मनहास यांनी गरज पडल्यास फिरकीपटू म्हणूनही कामगिरी बजावली तसेच यष्टीरक्षणाचीही भूमिका बजावली. त्यांनी दिल्ली संघाचे नेतृत्व केले. विशेष म्हणजे, त्यांनी दिल्लीचा कर्णधार असताना एक तरुण विराट कोहली संघात पदार्पण करत होता.

१८ वर्षांच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत मनहास यांनी १५७ सामन्यांमध्ये ९,७१४ धावा केल्या आहेत. त्यांच्या नावावर २७ शतके आणि ४९ अर्धशतके असून सरासरी ४६ इतकी आहे. आयपीएलमध्ये त्यांनी दिल्ली डेअरडेव्हिल्स (२००८-२०१०), पुणे वॉरियर्स (२०११-२०१३) आणि चेन्नई सुपर किंग्स (२०१४) या तीन संघांचे प्रतिनिधित्व केले. दिल्ली व जम्मू-कश्मीरच्या संघांतून देशांतर्गत क्रिकेट खेळून त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती.

# तायक्वांदो स्पर्धेत खारघरच्या संजीवनी स्कूलचे दमदार यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत खारघर येथील संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १४ पदके पटकावली आहेत.

यामध्ये मोरवी भाटी, प्रांजल खोडके यांनी सुवर्ण; लावण्या सोनटक्के, सर्बजित मोन्डल, अक्षय चौधरी यांनी रौप्य; तर जसलीन कौर, विहान चौधरी, अरुष राजवर, विश्व वेलणकर, साक्षी चव्हाण, प्रिशा पटानिया, मदीहा हमडुले, मोहम्मद सहजाह, शौर्य पवार यांनी कांस्यपदक जिंकले. या सर्व खेळाडूंना प्रमुख शिक्षक आंतरराष्ट्रीय तायक्वांदो पंच सुभाष पाटील, सहाय्यक प्रशिक्षक दिनेश म्हात्रे आणि क्रीडा शिक्षक वैभव सोनावणे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे संजीवनी स्कूलचे प्रिन्सिपल डॉ. अनुराग पांडे यांनी अभिनंदन केले.

# 'सीकेटी'च्या स्पर्धकांचे कराटेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा नुकतीच पनवेल येथील दि.बा. पाटील हायस्कूलमध्ये झाली. या स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

सौरभ शशिकांत रोडपालकर याने सुवर्णपदक प्राप्त केले असून त्याची मुंबई विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ईश्वरी उमेश गायकवाड हिने रौप्यपदक, तर अथर्व मनेष जाधव व रितुल रवींद्र म्हात्रे यांनी कांस्यपदक प्राप्त केले आहे.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नेपाळकडून वेस्ट इंडिजला पराभवाचा धक्का




**शारजा : वृत्तसंस्था**

एकेकाळी क्रिकेटविश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या वेस्ट इंडिजला अनुनभवी नेपाळने टी-२० सामन्यात पराभवाचा धक्का दिला. नेपाळने याआधी अफगाणिस्तान, झिम्बाब्वे यांना हरवले आहे, पण नियमित कसोटी खेळणाऱ्या देशाला हरवण्याची त्यांची ही पहिलीच वेळ आहे.

वेस्ट इंडिजने या मालिकेसाठी नव्या दमाचा संघ पाठवला आणि संघाचे नेतृत्व अकेल हुसेनकडे सोपवले. अकेलने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. नेपाळची सुरुवात चांगली झाली नाही, पण कर्णधार रोहित पौडेलने ३८, तर कुशल मल्लाने ३० धावांची खेळी केली. या दोघांनी भागीदारी करत नेपाळच्या डावाला आकार दिला. गुलशन झा याने २२ आणि दिपेंद्र सिंग अरी यांनी १७ धावांचे योगदान दिले. या चौघांनंतर नेपाळची पुन्हा घसरगुंडी उडाली आणि त्यांनी २० षटकात १४८ धावांची मजल मारली. विंडीजकडून अनुभवी जेसन होल्डरने २० धावांत चार विकेट्स घेतल्या. पदार्पणवीर नवीन बिडाइसने तीन विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली.

प्रत्युत्तरादाखल खेळताना अनुभवी काईल मेयर्स पाच धावा करून तंबूत परतला. आमिर जंगू आणि अकीम ऑगस्ट यांनी डाव सावरला. नंदन यादवने अकीमला बाद केले. पौडेलने जोएल अँड्यूला माघारी धाडले. ललित राजबंक्षीने जंगूला बाद करत महत्त्वपूर्ण यश मिळवून दिले. उत्तम फॉर्मात असणारा केसी कार्टी चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात रनआऊट झाला.

पाच बाद ६८ या स्थितीतून नवीन आणि होल्डर यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. कुश भुर्टेलने होल्डरला बाद करत वेस्ट इंडिजला अडचणीत आणले. भुर्टेलच्या बॉलिंगवर नवीन हिट विकेट झाला. त्याने अडखळत २२ धावा केल्या. कर्णधार अकेल होसेनने षटकारासह सुरुवात केली. फॅबिअल अॅलन आणि त्याने मिळून १८व्या षटकात १९ धावा चोपून काढल्या, मात्र १९व्या षटकात करण केसीने होसेनला बाद केले. त्याने नऊ चेंडूत १८ धावा केल्या. केसीने १९व्या षटकात शिस्तबद्ध मारा करत अवघ्या दोन धावा देत विकेटही पटकावली.

शेवटच्या षटकात वेस्ट इंडिजला जिंकण्यासाठी २८ धावांची आवश्यकता होती. फॅबिअनने पहिल्या चेंडूवर चौकार लगावला. दुसऱ्या चेंडूवरही त्याने चौकार वसूल केला, मात्र यानंतरचा चेंडू निर्धाव पडला. पाचव्या चेंडूवरही फॅबिअनला एकही धाव घेता आली नाही. सहाव्या चेंडूवर फॅबिअनने जोरकस फटका लगावला, पण भुर्टेलने सीमारेषेवर अफलातून झेल टिपला आणि नेपाळच्या चाहत्यांनी एकच जल्लोष केला. नेपाळने १९ धावांनी हा मुकाबला जिंकला.

## देवी दर्शन



शैलेश खोत, सर्वे, मुरुड



गावदेवी भवानी माता, रोठ बुद्रुक, रोहा



भक्तीसागर सोसायटी, धाटाव, रोहा










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com